सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध


ISBN
978-81-940842-0-4

• पुणे • वर्ष : २० • अंक ०४ • जुलै २०२४ • किंमत : रु. ३०/- • पृष्ठे ४० • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

## स्वागत नव्या केंद्रीय सहकार, अर्थ, कृषी, दुग्ध, मत्स्योत्पादन मंत्र्यांचे!!



**नरेंद्र मोदी**
पंतप्रधान




**अमित शहा**
सहकारमंत्री



**निर्मला सितारामन**
अर्थमंत्री



**मुरलीधर मोहोळ**
सहकार राज्यमंत्री



**कृष्ण पाल**
सहकार राज्यमंत्री



**शिवराजसिंग चौहान**
कृषीमंत्री



**लालन सिंग**
पशु, दुग्ध व मत्स्य मंत्री



**गिरीराज सिंग**
वस्त्रोद्योग मंत्री



## सहकार भारती झारखंड प्रदेश अधिवेशन

सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी
**सहकार भारती प्रयत्नशील**
– राष्ट्रीय अध्यक्ष दीनानाथ ठाकूर




सहकार भारती उत्तराखंड प्रदेश अधिवेशन



जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेने विकसित केले 'मोबाईल ॲप'


दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
ISO 9001-2015
स्थापना-१९९४
आपला परिवार, आपली संस्था!
सीताराम भवन
ऑडिटोरियम आणि गेस्ट हाऊस
वाढदिवस | मुंज | लग्न | साक्षगंध
सांस्कृतिक कार्यक्रम | कॉन्फरन्स
BANKING P.O
90 DAYS TRAINING
BANKING POINT PROGRAMME P.O.
A Bridge of Banking Career
100% Placement Guarantee*
Join The Dharampeth Mahila Society
Probationary Officer Programme P.O.
Enroll Now & Grab The Opportunity
Contact : 7888002023
Authorised
RAIL TICKET RESERVATION CENTRE
फ्लाईट
क्रूज
हॉटेल
बस
ONLINE BOOKING FACILITY AVAILABLE AT ALL BRANCHES
Contact : 7020218417
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
LOCKERS सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
SMS अर्लट
MOBILE बँकिंग
CORE बँकिंग
LOAN सेवा सुविधा
DEPOSIT सुविधा
₹ 2200 कोटींच्या वर व्यवसाय
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
मुख्य कार्यालय
प्लॉट नं. ४२-अ,
सीताराम भवन,
राम नगर चौक, शिवाजी नगर,
नागपूर-१०
फोन
0712-2524337 / 2520303
ई-मेल : info@dpmahila.com
संस्थेच्या शाखा
नागपूर विभाग:
• धरमपेठ 0712-2520555
• महाल 0712-2735653
• खामला 0712-2283704
• सदर 0712-2555525
• धंतोली 0712-2424918
• नंदनवन 0712-2744050
• मानेवाडा 0712-2704057
• त्रिमूर्ती नगर 0712-2243601
• मनीष नगर 0712-2782126
• हुडकेश्वर 0712-2754311
• मानकापूर 0712-2302309
• नरेंद्रनगर 0712-2782781
• बजाज नगर 0712-2241112
• शिवाजी नगर 0712-2220716
• उमरेड 07916-243275
• हिंगणा रोड 9763742291
पूणे विभाग:
• सदाशिव पेठ 020-24321933
• सिंहगड रोड 020-24347624
• कर्वे नगर 020-25439008
• कोथरुड 020-25394449
• सहकार नगर 020-24211009
• वडगांव (खुर्द) 7264068734
मध्यप्रदेश: • इंदौर 0731-2436200
विदर्भ:
• चंद्रपूर 07172-276705
• भंडारा 07184-250838
• वर्धा 07152-250002
• अमरावती 0721-2563704
• गोंदिया 07182-234199
• यवतमाळ 07232-244314
• वणी 07239-228058

राजर्षी शाहू
र.नं ८१९

ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था, FCBA पुरस्कार प्राप्त संस्था,
मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था

अपेक्षेपेक्षा अधिक लाभ देणारी विश्वसनीय संस्था

अखंड वाढ आपल्या गुंतवणुकीची..!
दाम दुप्पट ठेव योजना

- सोने तारण कर्ज
- वेअर हाऊस कर्ज
- अल्पबचत कर्ज
- वाहन तारण कर्ज
- बचत गट कर्ज

# आषाढी एकादशी
निमित्त सर्व भाविक भक्तांना तसेच सर्व सभासद बंधू भगिनींना
हार्दिक शुभेच्छा..!



**संदीप शेळके**
अध्यक्ष- राजर्षी शाहू परिवार
संकल्पक- वन बुलडाणा मिशन

## राजर्षी शाहू विशेष लखपती ठेव योजना
- २४५०/- रू. प्रतिमाह ३६ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
- १७००/- रू. प्रतिमाह ४९ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
- १३५०/- रू. प्रतीमाह ६० महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
- ६५०/- रू. प्रतीमाह ६२ महिने भरा मिळवा रु.५०,०००/-

- शाहू पे
- मोबाइल बँकिंग
- नेट बँकिंग
- डोअरस्टेप बँकिंग
- RTGS
- NEFT

### संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकुण ६९ शाखेचा विस्तार
२. ८०० कोटींचा व्यवसाय
३. १००००० सभासद संख्या
४. 'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ३५ हजार महिलांना १२५ कोटी रू. चे कर्ज वाटप

Shahu Pay
खातेदारांना पेपरलेस् विड्रॉल देणारी राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था
शाहू पे ॲप व्दारे कोणत्याही शाखेमध्ये विड्रॉल फॉर्म न भरता QR कोड स्कॅन करून विड्रॉल करता येईल.

MAHAVITARAN
MSEB
विज बिल भरणा केंद्र



कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
# राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा

**सौ.मालती शेळके**
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑफ क्रेडीट सोसा. मर्या. बुलडाणा

www.rajarshishahumultistate.com | +91-9528490490

# प्रशिक ग्रामीण सहकारी पतसंस्था

पुंजानी कॉम्प्लेक्स, कारंजा (लाड) जि. वाशिम. र. नं. 760




प्रशिक फार्मर प्रोड्युसर कंपनी तर्फे

सर्व शेतकरी होतील माल माल आणि खुशहाल!

## बीज उत्पादन केंद्र तथा सोयाबीन बियाणे विक्री केंद्र

## दर्जेदार बियाणे

## KDS 726/ KDS 753

सर्व शेतकरी बांधवांना अल्प दरात उपलब्ध

विक्री वेळ - सकाळी १० ते सायं. ६

संपर्क - व्यवस्थापक - ९५८८६ ६१८८२

* स्थळ *

मुर्तिजापूर रोड, रिद्धी सिद्धी मंगल कार्यालय

नायरा पेट्रोल पंपासमोर, कारंजा (लाड)

# नेटविन सिस्टीम्स & सॉफ्टवेअर [इं] प्रा. लि. नाशिक

netwin
Ideas to Life









## विश्वसनीय QR पेमेंट सुविधा पुन्हा एकदा आपल्या सेवेत, व्यवसाय वाढवा NetPayUPI च्या सहकार्याने.

### aceBank-CBS कोअर बँकिंग सोल्यूशन सह आमच्या इतर सुविधा.

- Whatsapp बँकिंग
- eNACH
- LOS
- IMPS
- ONLINE ACCOUNT OPENING PORTAL
- लोन रिकव्हरी अँप
- मोबाईल बँकिंग
- मोबाईल मनी कलेक्शन
- NEFT & RTGS
- VOICE MESSAGING SERVICE

NetPayUPI

## अधिक माहिती साठी संपर्क करा

०२५३ ६६५ १५००

sales@netwinindia.in | www.netwin.in

Certification's

ISO | ISO | CMMI LEVEL 5 | TIER3 DATA CENTER | CISA certified

VISUAL
INFOSYSTEMS PRIVATE LIMITED
A core banking software solutions

2500+ SATISFIED CLIENTS

# VISUAL INFOSYSTEMS PVT. LTD.

**A CORE BANKING SOFTWARE SOLUTIONS**

संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अग्रेसर असलेले
सर्वाधिक पसंतीचे कोअर बँकिंग सॉफ्टवेअर



## FACILITIES IN SOFTWARE

- MOBILE APPS
- AADHAR/PAN VERIFICATION
- CREDIT SCORE REPORT
- RTGS/IMPS/NEFT
- QR CODE COLLECTION
- ALL AUDIT REPORTS
- DOOR STEP BANKING
- BULK SMS

## SOFTWARE FOR

- CO-OP BANK ✔
- CO-OP CREDIT SOCIETY ✔
- MULTI-STATE SOCIETY ✔
- EMPLOYEE SOCIETY ✔
- NBFC /NIDHI ✔

**CERTIFICATIONS :**
VAPT & CERT - in Certification for
Web and Android App Certified
by TUV-SUD ISO 9001:2015
ISO/IEC 27001:2013

**CORPORATE OFFICE :**

Visual Infosystems Pvt. Ltd.
Head Office :
Third Floor, Malan Plaza, Near Durga Mata Mandir,
Akashwani Road, Chhatrapati Sambhajinagar
(Aurangabad) – 431005

BRANCH OFFICE- PUNE

**Contact Us :**
+91 9423000202 +91 9209000096
+91-8080342437 +91 9763878000
+91 8080762775 +91 9156422284
+91 9545002127 +91 9763873000

Email : info@visualinfosystems.in
Website : www.visualinfosystems.com


प्रत्येकवेळी कानावर पडणारा आवाज आनंदाचा!
ADVITA CREDIT
SCAN WITH BHIM UPI
APPS TO PAY | ALL IN ONE QR
INDIA'S MOST TRUSTED
QR PAYMENT SOUND BOX
Powerful Speaker Clear Audio
Long-lasting 10 day Battery
4G Network Connectivity
विविध अर्थसंस्थेसाठी विशेष ऑनलाईन / आधुनिक तंत्रज्ञानाची प्रणाली
पतसंस्था
को-ऑप. सोसायटी
निधी कंपनी
को-ऑप. बँक
मल्टीस्टेट
क्रेडिट को-ऑप. सोसायटी
अधिक महितीसाठी संपर्क करा
मुख्य कार्यालय : ए-३०३, स्वागत इन्क्लेव्ह हाऊसिंग सोसायटी, जांभुळवाडी रोड,
आंबेगाव खुर्द, हवेली, पुणे. (महाराष्ट्र) ४११०४६
श्री. अतुल वाकोडे 9552823088
श्री. प्रविण भंडारकर 7972680755
श्री. विशाल पद्मावर 9604026006
हेल्पलाईन 9552823088
ऑनलाईन डेमोसाठी 96 0402 6006 | Email : info@advitacredit.in | www.advitacredit.in
कार्यक्षेत्र : • महाराष्ट्र • गोवा • मध्यप्रदेश • गुजरात • छत्तीसगड • राजस्थान • उत्तरप्रदेश • हरियाणा • कर्नाटक • तेलंगना

बिना संस्कार, नही सहकार

रजि. नं. : 111

बिना सहकार, नही उद्धार

# "संस्कार"

## क्रेडीट को-ऑप. सोसायटी मर्या., गडचिरोली

" संस्कार भवन ", श्री दोषहरजी मो. फाये यांचे निवासस्थान,
गांधी चौक, कुरखेडा, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली -441 209
मो.: 8237176249 / 7378560952

**ठेवी तुमच्या स्वप्नपूर्तीचा आधार, आम्ही संस्कार परिवार !**






**मा. मनिष दोषहरजी फाये**
संस्थापक अध्यक्ष



**मा. चांगदेव फाये**
उपाध्यक्ष



**मा. धिरज बांगरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**संचालक मंडळ**

मा. नितीन बा. कावळे
मा. दिनदयाल शि. भट्टड
मा. परसराम के. नाट
मा. प्रशांत के. मोहुर्ले
मा. हरिष ध. टेलका
मा. लक्ष्मण जा. धुळसे
मा. मंगेश के. मांडवे
मा. सौ. चेतना रो. कुंभलवार
मा. सौ. मंगला शि. वडीकर

## * संस्थेची वैशिष्ट्ये *

- संपूर्ण व्यवहार संगणकीकृत व CBS कोअर बँकिंग सुविधा.
- NEFT / RTGS / IMPS सेवा उपलब्ध.
- मोबाईल बँकींग, इंटरनेट बँकींग सेवा उपलब्ध.
- QR Code सुविधा उपलब्ध.
- ATM विड्रॉल सेंटर
- इलेक्ट्रीक बिल संकलन केंद्र
- सर्व प्रकारचे रिचार्ज सेंटर
- पॅन कार्ड सेंटर
- विमा प्रीमियम कलेक्शन सेंटर

।। बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ।।

# अनुक्रम


सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी सहकार भारती प्रयत्नशील राष्ट्रीय अध्यक्ष दीनानाथ ठाकूर यांचे प्रतिपादन ............ ११

केंद्रीय सहकार मंत्रिपदी अमित शहा, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ ............ १२

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणार – सहकार मंत्री वळसे पाटील ............ १३

नफा कोणता खरा ? ऑडिटचा की आरबीआय इन्स्पेक्शनचा ? ............ १४

भविष्यातील ऑनलाईन डिजिटल क्रांतींचे फलित... ............ १६

पतसंस्थांची गुंतवणूक होत आहे जोखमीची! ............ १६

जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेने विकसित केले 'मोबाईल ॲप' ............ १७

सहकारी पतसंस्था संरक्षण योजनेतील त्रुटी दूर करण्याची आवश्यकता ............ १८

महिला उद्योजिकांच्या सक्षमीकरणासाठी पंढरपूर अर्बन बँकेचा उपक्रम ............ १९

नागरी सहकारी बँकांनी व्यवसायाबरोबर सुरक्षिततेवर भर द्यावा ............ २०

सहकारी पतसंस्थांनी दैनंदिन व्यवहारात पाळायची तत्त्वे ............ २१

सहकारातूनच प्रत्येक व्यक्तीचा विकास शक्य ............ २२

देवगिरी बँकेला 'इनोव्हेटिव्ह बँक ऑफ द इयर' पुरस्कार प्रदान ............ २३

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला 'रिस्क मॅनेजमेंट'साठी आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान ............ २४

व्हॅमिनीकॉम आणि एमसीडीसीत सामंजस्य करार ............ २५

शिक्षण क्षेत्राला सहकारी बँकांनी आर्थिक पाठबळ द्यावे ............ २६

उत्तराखंड प्रदेश अध्यक्षपदी विनोद गौड यांची निवड ............ २७

गृहरचना संस्था – शंका समाधान ............ २९



'सहकार सुगंध' हे मासिक मालक, सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक भालचंद्र कुलकर्णी यांनी एन. आर. एंटरप्राजेस, स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रियल इस्टेट, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे छापून ए-१२, निखिल पार्क सी सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे प्रसिद्ध केले.

**संपादक –** भालचंद्र कुलकर्णी

'Sahakar Sugandha' monthly is owned by 'Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., printed & published by Bhalchandra Kulkarni, Printed at N. R. Enterprises, S.No. 39, Manikbaug Industrial Estate, Sinhgad Road, Pune - 411051 & published at A-12, Nikhil Park, 'C' Society, Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051.
Editor : Bhalchandra Kulkarni



# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

**जुलै २०२४ (वर्ष २०, अंक ०४)**



**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)



**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय महामंत्री)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
श्री. दीनानाथ ठाकूर (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. रमेश वैद्य (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
डॉ. शशिताई अहिरे (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. संजय परमणे (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर (डॉ. विखे पाटील सहकार अध्यासन प्रमुख)
श्री. सतीशजी मराठे, श्री. ज्योतिंद्रभाई मेहता,
श्री. विष्णूजी बोबडे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**दि. १ मे २०२२ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ४००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १०००/- फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**


**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, निर्मिती शोरुमच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# सहकार चळवळीतील मंत्र्यांचे स्वागत !

केंद्रात पुन्हा तिसऱ्यांदा नरेंद्र मोदींचे सरकार विराजमान झाले. मोदी सरकारची ही तिसरी टर्म पुन्हा नव्याने सुरू झाली आहे. सन २०१४ आणि सन २०१९ मधील भाजपाचे संख्याबळ काहीसे घटले असले तरी, अन्य मित्रपक्षांच्या मदतीने पुन्हा त्याच जोशाने मोदी सरकार 'सबका साथ, सबका विकास' हे ब्रीद घेवून कामाला लागले आहे. सन २०२१ मध्ये केंद्रात नव्याने सहकार मंत्रालय आणल्यापासून देशभरातील सहकार चळवळीला नवी उर्जा प्राप्त झाली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी प्रथमपासूनच सहकार मंत्रालयाची धुरा सांभाळली आहे. त्यांच्या समर्थ नेतृत्वात सहकार क्षेत्रात अनेक चांगले बदल, सुधारणा झाल्याचे चित्र आहे.

सहकार क्षेत्राचा संबंध विविध मंत्रालयांशी येतो. सन २०२४ च्या तिसऱ्या टर्ममध्ये या मंत्रालयांना नवे चेहरेदेखील मिळाले आहेत. सहकार चळवळीतील नागरी सहकारी बँका, मल्टिस्टेट पतसंस्था यांचा जवळचा संबंध अर्थमंत्रालयाशी येतो. निर्मला सितारामन यांना पुन्हा अर्थमंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली आहे. याशिवाय नव्या मंत्र्यांमध्ये सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि कृष्ण पाल यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे. कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, दुग्ध, पशू व मत्स्योत्पादन मंत्री लालन सिंग (राजीव रंजन सिंग) आणि वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंग नव्याने मोदी सरकारच्या तिसऱ्या टर्ममध्ये आले आहेत. या सर्व मंत्रालयांचा थेट संबंध सहकार चळवळीशी आहे.

सहकार चळवळीत नागरी बँका, बहुराज्यीय पतसंस्था, विविध कार्यकारी सोसायट्या (पॅक्स), जिल्हा मध्यवर्ती बँका, कृषी (ज्यात साखर उद्योग महत्वपूर्ण आहे), दूध संघ (डेअरी), पशुपालन व मत्स्योद्योग आणि वस्त्रोद्योग अशा विविध क्षेत्रांचा प्रामुख्याने समावेश होतो. याशिवाय गृहनिर्माण (हौसिंग) आणि ग्रामीण विकास हे विभागदेखील सहकाराशी निगडीत आहेत. सहकार मंत्रालय सुरू झाल्यापासून अमित शहांनी सर्वप्रथम देशभरातील सहकार चळवळीतील या सर्व क्षेत्रांची आकडेवारी जमा करण्यास सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी सहकार डेटाबेस विभाग निर्माण केला आणि आज त्यावर अधिकृत आकडेवारी दिसू लागली आहे. यासाठी केंद्रीय सहकार मंत्रालय अधिक सक्षम बनवण्यात आले आहे.

देशभरातील सहकार चळवळीचा डेटाबेस (नॅशनल कोऑपरेटिव्ह डाटाबेस) अत्यंत महत्वपूर्ण असल्याचे आकडेवारी पाहतांना दिसून येते. देशातील सुमारे ५० टक्के लोकसंख्या ही सहकार क्षेत्राशी थेट संबंधित आहे, ज्याचा मोठा सहभाग अर्थकारणात दिसून येतो. एकट्या महाराष्ट्रात सुमारे २.५० लाख सहकारी संस्था आहेत, ज्यात सुमारे १.२५ लाख गृहनिर्माण संस्था आहेत तर २० हजार पतसंस्था, २० हजार विकास सोसायट्या, १२ हजार मजूर संस्था आहेत. कर्नाटक, गुजरात, उत्तरप्रदेश आणि केरळ या राज्यांमध्ये देखील सहकाराचे विस्तृत जाळे पसरलेले आहे. देशभरातील सहकार क्षेत्राचा विस्तार आता नव्याने होण्याची आवश्यकता आहे.

'सहकार से समृद्धी' हे ब्रीदवाक्य प्रथमपासूनच सहकार मंत्रालयाने घेतले आहे, ज्याचे दृश्य परिणाम आता दिसू लागले आहेत. 'राष्ट्रीय सहकार धोरण' लवकरच आणले जाणार असल्याची घोषणा नुकतीच नवे सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केली आहे. सहकार चळवळीचा थेट संबंध अर्थकारणाशी येतो. त्यामुळे नव्या सहकार धोरणात काही अपेक्षा निश्चितच आहेत. सहकार क्षेत्राचा विस्तार आणि वृद्धी देशभरातील सर्वच राज्यांमध्ये होण्याची गरज आहे. सहकारी संस्थांच्या नोंदणीचे निकषदेखील सुयोग्य व सहज असावेत अशी देखील एक मागणी आहे. सहकारी संस्था या स्वायत्त आहेत आणि या संस्थांना घटनेने मूलभूत अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यामुळेच सहकार चळवळीत सरकारचा हस्तक्षेप असू नये, तर सरकारचे संरक्षण आणि मार्गदर्शन असण्याची गरज आहे. सहकार क्षेत्रातील संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी नवीन धोरणात काही ठोस उपाययोजना असण्याची गरज आहे. जय सहकार!!



संपादकीय...



# सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी सहकार भारती प्रयत्नशील
## राष्ट्रीय अध्यक्ष दीनानाथ ठाकूर यांचे प्रतिपादन

**झारखंड –** देशातील सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी आणि विकासासाठी सहकार भारतीच्या वतीने व्यापक स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत जेणे करून समाजातील शेवटच्या नागरिकाचा विकास होण्यास हातभार लागणार आहे असे मत सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष दीनानाथ ठाकुर यांनी येथे सांगितले. सहकार भारतीचे चौथे प्रादेशिक अधिवेशन संथाल परगणा येथे झाले, त्यावेळी ते बोलत होते.

या अधिवेशनात प्रदेश अध्यक्षपदी डॉ. अमरेन्द्र पाठक तर महामंत्रीपदी धनंजय कुमार सिंह यांची निवड करण्यात आली. तसेच नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. अध्यक्ष ठाकुर यांनी भाषणात सहकार भारतीच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेतला, ते म्हणाले, देशाच्या विविध राज्यात सहकार भारती कार्यरत आहे. या माध्यमातून विविध कार्यकारी संस्था (पॅक्स) अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. जेणे करून युवा पिढीला रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यामुळे समाजाच्या आणि व्यक्तिगत पातळीवरील प्रगतीला नक्कीच मदत होणार आहे.

राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांनी सांगितले की, येथील कामगार, विविध क्षेत्रात काम करणारे मजूर यांना पुरेशा प्रमाणात वेतन मिळत नाही, यासाठी कामगारांची सहकारी संस्था निर्माण झाली. तर या माध्यमातून कल्याणकारी योजना प्रत्यक्षात आणणे शक्य होणार आहे. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येतील. झारखंडचे सहकार मंत्री बादल पत्रलेख यांनी सर्व सहकार्य करण्याचे जाहीर केले.

प्रदेश कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी अर्चना, संघटन प्रमुख भारत भूषण, प्रदेश मंत्री रीतेश रंजन झा, राकेश चौधरी, रीता समद यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणीत विमल कुमार, शिवशंकर मंडल, अनिमा पांडे, उमेश चौरासिया, अजित सिंह, सुबोध कुमार, विजय कुमार, सुजीत कुमार यांची निवड करण्यात आली. सहकार भारती राष्ट्रीय महिला प्रमुख रेवती शेंदुर्णीकर उपस्थित होत्या. अधिवेशनासाठी २२ जिल्ह्यांतील सहकार भारतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# सहकार क्षेत्राच्या विस्तारावर भर देणार – सहकार मंत्री शहा

**नवी दिल्ली –** गेल्या पांच वर्षांत सहकार मंत्रालयाच्या वतीने सहकार क्षेत्र विस्तारासाठी पायाभूत सुविधा विकसित केल्या आहेत. आता या सुविधांच्या आधारावर सहकार क्षेत्र अधिक प्रमाणावर विस्तारित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे अशी माहिती केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी सांगितली.



केंद्रीय सहकार मंत्री
अमित शहा

सहकार मंत्रालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी ही माहिती सांगितली. ते म्हणाले, देशाच्या विविध राज्यात सहकार क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. मात्र यामध्ये आणखी वाढ करण्याची गरज आहे, यामधून स्वयंरोजगार निर्माण करण्याबरोबर उद्योग क्षेत्र विकसित होण्यास हातभार लागणार आहे देशातील सहकारी संस्थांची आकडेवारी संकलित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या सहकारी संस्था परस्परांना संगणकाच्या माध्यमातून जोडण्यात आल्या आहेत. यादृष्टीने गेल्या काही वर्षांत काम करण्यात आले आहे. या आधारावर पुढील काळात नवीन योजना सुरू करण्यात येणार आहेत असे त्यांनी संगितले.

सहकार क्षेत्राला भांडवलाचा पुरवठा वाढावा यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार आहेत असे नमूद करून ते म्हणाले, यासाठी आगामी शंभर दिवसांचा कार्यक्रम लवकरच तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. जुलै २०२१ मध्ये सहकार मंत्रालय तयार करण्यात आले. आणि या मंत्रालयाच्या माध्यमातून लहान उद्योग भांडवल पुरवठ्याच्या माध्यमातून सुरू करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. सहकार क्षेत्रातून बियाणे विकसित करणे, सेंद्रिय शेती आणि शेत मालाची निर्यात वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. सहकारातून समृद्धी हा मंत्र ध्यानात ठेवून मंत्रालयाची स्थापना करण्यात आली आहे, याच दृष्टीकोनातून आगामी काळात प्रयत्न करण्यात येणार आहेत, असे ते म्हणाले.

# केंद्रीय सहकार मंत्रिपदी अमित शहा, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

**नवी दिल्ली –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात सहकार खात्याची जबाबदारी अमित शहा यांच्याकडे कायम ठेवण्यात आली असून या खात्याच्या राज्यमंत्रीपदाची जबाबदारी पुणे लोकसभा मतदार संघातून विजयी झालेले भारतीय जनता पक्षाचे मुरलीधर मोहोळ यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. प्रदीर्घ कालावधीनंतर केंद्रात खासदार मोहोळ यांच्या रूपाने मंत्रीपद मिळाले आहे.




केंद्रीय राज्यमंत्रीपदाची शपथ घेतलेल्या खासदार मोहोळ यांनी सहकार मंत्रालयाच्या राज्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला आहे. कार्यभार स्वीकारण्यापूर्वी मोहोळ यांनी केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांची भेट घेऊन मार्गदर्शन घेतले. राज्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारताना विभागाचे केंद्रीय सचिव डॉ. आशिष कुमार भूटानी उपस्थित होते.

कार्यभार स्वीकारल्यानंतर सहकार राज्यमंत्री मोहोळ यांनी सांगितले की, 'भारतीय जनता पार्टीत सामान्य कार्यकर्त्यांना मोठ्या पदांवर काम करण्याची संधी मिळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली आहे. या संधीचा उपयोग महाराष्ट्रातील आणि देशातील सहकार चळवळीला बळ देण्यासाठी करण्याचे ध्येय ठेवले आहे. सहकार क्षेत्राबद्दल सामान्यांमध्ये विश्वासार्हता निर्माण करण्याचे काम प्राधान्याने करायचे आहे.

केंद्रीय पातळीवर सहकार मंत्रालयाची स्थापना झाल्यानंतर सहकाराबद्दल आणखी विश्वास वाढवण्याचे आणि सहकाराची वृद्धी करण्याचे काम सुरू असून महाराष्ट्राच्या दृष्टीने हे मंत्रालय अतिशय महत्त्वाचे आहे. सहकाराची पाळेमुळे देशाच्या ग्रामीण भागात पसरली असून या मंत्रालयामार्फत ग्रामीण जनतेसाठी काम करता येईल, याचे समाधान आहे.

# नवीन राष्ट्रीय सहकार धोरण लवकरच जाहीर होणार

## सहकार राज्यमंत्री मोहोळ यांचे सूतोवाच

**पुणे –** केंद्र सरकारच्या वतीने तयार करण्यात आलेल्या नवीन राष्ट्रीय सहकार धोरणाची घोषणा लवकरच केली जाणार आहे. या धोरणाच्या माध्यमातून तळागाळातील लोकांना समृद्ध करण्यावर भर दिला जाणार आहे अशी माहिती केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी वार्तालाप कार्यक्रमात बोलताना सांगितली. दोन्ही खात्याकडून सर्वसामान्य नागरिकांच्यादेखील खूप अपेक्षा आहेत आणि त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न राहतील, असे स्पष्ट केले.

नवीन सहकार धोरणाची घोषणा यापूर्वीच होणार होती. मात्र निवडणूक आचारसंहितांमुळे त्यास विलंब झाला. मात्र आता लवकरच हे धोरण जाहीर होणार असून देशभरातील छोट्या छोट्या घटकांपर्यंत त्याचा लाभ पोचावा आणि सहकार चळवळ अधिक सक्षम व्हावी, यादृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**⁂ वैकुंठभाई मेहता सहकार व्यवस्थापन संस्थेला भेट –**

केंद्रीय सहकार राज्यमंत्री मोहोळ यांनी वैकुंठभाई मेहता सहकार व्यवस्थापन संस्थेला सदिच्छा भेट दिली आणि कामकाजाची माहिती घेतली. संस्था संचालिका डॉ. हेमा यादव यांनी त्यांचे स्वागत केले. आणि संस्थेच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती सांगितली. यावेळी त्यांनी संस्थेतील अधिकारी आणि अन्य संचालक मंडळाबरोबर संवाद साधला.

# राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर

**मुंबई –** राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका नवीन आदेशानुसार पुढे ढकलण्यात आल्या आहेत. आता नवीन वेळापत्रकानुसार सहकारी संस्थांच्या निवडणुका सप्टेंबरनंतर होणार आहेत, असे शासनाच्या वतीने प्रसिद्धीस देण्यात आलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. शासनाचे कार्यासन अधिकारी अनिल चौधरी यांनी हे आदेश काढले आहेत.

याबाबतच्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे की, चालू आर्थिक वर्षातील राज्यातील २४ हजार ७१० सहकारी संस्थांची निवडणूक प्रलंबित असून त्यातील ८३०५ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. निवडणुका पुढे जाण्याचे कारण स्पष्ट करताना आदेशात म्हटले आहे की हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा होणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांना खरीप पेरणीच्या कामात बराचसा वेळ द्यावा लागणार आहे आणि बहुतांशी शेतकरी हे विविध सहकारी संस्थांचे सदस्य आहेत. परिणामी त्यांना निवडणुक प्रक्रियेत सहभागी होणे अशक्य होणार आहे. म्हणून सहकारी संस्थांच्या निवडणुका येत्या ३० सप्टेंबर पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या आहेत आणि सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३क नुसार निवडणुका पुढे ढकलण्याचा अधिकार शासनास आहे.

# पंजाबमध्ये सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रेशन शुल्कात मोठी कपात

**पंजाब –** सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रेशन शुल्कात मोठी कपात करण्याचा निर्णय पंजाब शासनाने घेतल्याबद्दल सहकार भारतीचे उत्तर क्षेत्राचे संघटन प्रमुख शंकर तिवारी यांनी शासनाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. नोंदणी शुल्क २० लाख रुपये होते, ती रक्कम रुपये दहा हजार करण्यात आली आहे.

या नोंदणी शुल्काच्या बाबत सहकार भारतीच्या वतीने जागरूकता मोहीम सुरू करण्यात आली होती. आणि हे शुल्क कमी करण्याबाबत सतत मागणी करण्यात आली आणि या मोहिमेला प्रदीर्घ कालावधीनंतर यश मिळाले आहे. गतवर्षी सप्टेंबर महिन्यात शुल्काबाबत निर्णय घेण्यात आला होता. मात्र या वाढीमुळे सहकार क्षेत्राचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला. पंजाब जवळील राज्यात अशा प्रकारचे शुल्क आकारले जात नाही, मग पंजाबमध्येे देखील आकारले जाऊ नये अशी मागणी करण्यात आली आहे.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणार - सहकार मंत्री वळसे पाटील

**पुणे** – राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सांगितले. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा व पीक कर्ज वाटपाचा आढावा घेण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते.




आमदार प्रविण दरेकर, सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, सहकार आयुक्त दीपक तावरे, अपर आयुक्त व विशेष निबंधक शैलेश कोतमिरे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, माजी आमदार शिवाजी कर्डिले, आमदार मानसिंगराव नाईक, विविध जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे पदाधिकारी, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय सहनिबंधक उपस्थित होते.

अडचणीतील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढून त्याचा अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ होण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करावा. आर्थिक अडचणीतील नागपूर आणि नाशिक या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा कृती आराखडा सादर करणे बाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. या बँकांची स्थिती सुधारण्यासाठी वेगळी योजना राबविण्याबाबत विचार करण्यात यावा. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि विकास सोसायटीच्या आर्थिक सक्षमतेच्या दृष्टीने विभागाने नियोजन करावे. अधिकाऱ्यांनी नवीन विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची स्थापना करण्यासाठी प्रयत्न करावेत. आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अडचणीत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना बाहेर काढण्यासाठी शासनाच्या वतीने भरीव तरतूद करण्यात यावी आणि याबाबत एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याबाबत आमदार दरेकर यांनी सूचना केली. अनास्कर म्हणाले, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आपले व्यवहार पारदर्शक राहील, याबाबत दक्षता घ्यावी. राज्य सहकारी बँकेच्या वतीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना विश्वासात घेऊन सहकार्य करण्यात येईल, याबाबत एक योजना आखण्यात येईल.

बैठकीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या आर्थिक स्थिती, पीक कर्ज वाटप, सहकारी कर्जवसुली आदी विषयाबाबत चर्चा करण्यात आली.

---

# देशातील सहकारी साखर उद्योगाचा पुढील दहा वर्षांचा आराखडा करणार

## राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ अध्यक्ष - हर्षवर्धन पाटील

**पुणे** – उसाच्या किमान विक्री दरात दरवर्षी वाढ होत असली तरी साखरेच्या किमान विक्री दरात वाढ झाली नाही. त्यामुळे साखर उद्योगासमोरील अडचणी वाढत आहेत. म्हणूनच साखरेचा किमान विक्री दर प्रती किलो ४२ रुपये करण्यात यावा, अशी मागणी केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे अशी माहिती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले. तसेच आगामी दहा वर्षासाठीचा साखर उद्योगाचा आराखडा तयार करण्यात येणार असून त्यामध्ये साखर उद्योगाशी संबंधित विविध बाबींचा विचार केला जाणार आहे, असे ते म्हणाले.



ते म्हणाले, गेल्या ९ वर्षांत किमान दरात वाढ झाली नाही. तसेच अनेक वर्षांपासून साखरेचा किमान दरप्रश्न प्रलंबित आहे. त्यावर निर्णय होत नाही. एफआरपी दरात वाढ होते, पण साखरेचे किमान दर तसेच आहेत. म्हणूनच याबाबतचा प्रस्ताव इस्मा आणि महासंघ यांनी तयार करून सरकारला सादर केला आहे. देशातील साखर कारखान्यांकडे शिल्लक असणाऱ्या सुमारे ७ लाख टन बी हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल उत्पादन घेण्यास परवानगी देण्यात आली आहे.

येत्या ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या आगामी ऊसाच्या गळित हंगामामध्ये ऊस तोडणी यंत्राची उपलब्धता व्यापक प्रमाणावर व्हावी, यासाठी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ आणि राष्ट्रीय सहकार विकास निगम यांच्या संयुक्त प्रयत्नातून ऊस तोडणी यंत्राची उपलब्धता करून दिली जाणार आहे.

देशातील साखर उद्योग हा महत्त्वाचा घटक आहे असे नमूद करून ते म्हणाले, या घटकाला सर्वात अधिक प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. हे लक्षात घेऊन आराखडा तयार केला जाणार आहे. यामध्ये या उद्योगाशी संबंधित विविध बाबींचा विचार करता येणार आहे. साखर उत्पादन, त्याचा दर, उसाचा दर, इथेनॉल दर, तसेच अन्य खर्च आदी बाबीचा विचार केला जाणार आहे. देशातील साखर उद्योगाचा पुढील दहा वर्षांचा तरी आराखडा तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यामध्ये साखर उद्योगाच्या सर्वंकष धोरणात्मक निर्णयाचा समावेश असणार आहे, यासाठी तज्ञ संस्थेची मदत घेण्यात येत आहे.

साखर उद्योगाने साखर विकासनिधीच्या माध्यमातून घेतलेल्या एकूण ८१२ कोटींच्या कर्जापोटी अनेक रकमांची परतफेड प्रलंबित होती. हा प्रश्न मार्गी लावण्यास यश मिळाले आहे, असे ते म्हणाले.

# नफा कोणता खरा ? ऑडिटचा की आरबीआय इन्स्पेक्शनचा ?

मागील वर्षी महाराष्ट्रातील एका नामांकित मल्टिस्टेट शेड्यूल्ड नागरी सहकारी बँकेमध्ये एक अपवादात्मक अशी अद्भुत परिस्थिती उद्भवली. काहीशी तशा प्रकारची परिस्थिती याआधी अन्य काही बँकांमध्ये पण उद्भवलेली असू शकते वा यापुढे पण उद्भवू शकते. पण त्या बँकेबाबत झालेली परिस्थिती विशेषच होती.

कारण ती परिस्थिती अशी होती की, त्या बँकेच्या नफातोटा पत्रक व ताळेबंद इत्यादीचे ऑडिट (वैधानिक लेखापरीक्षण) एका नामांकित आणि अनुभवी सी.ए. फर्मकडून पूर्ण झाले होते. त्या हिशोब-पत्रकांप्रमाणे बँक अगदी व्यवस्थित नफ्यात होती. त्या बँकेने तीची ती लेखापरिक्षीत वार्षिक लेखापत्रके (ऑडिटेड एन्युअल फायनान्सियल स्टेटमेंट्स) रिझर्व्ह बँकेकडे वेळेत सादर केली होती व त्यानंतर साहजिकच, ३० सप्टेंबर पूर्वी, वार्षिक सभेपुढेही ती सादर केली होती . संचालक मंडळाने नफ्याची जी विभागणी प्रस्तावित केली होती, ती सदर वार्षिक सभेमध्ये एकमताने मंजूरही झाली. त्याप्रमाणे बँकेने नफा विभागणीच्या (Appropriations) नोंदीही केल्या व त्याचाच एक भाग म्हणून सभासदांना लाभांशही वितरित केला. अशा प्रकारे सर्व काही कायद्याला धरून, वेळेत व व्यवस्थित झाले.




**सीए उदय कर्वे**
**९८१९८६६२०१**


हे सर्व झाल्यानंतर काही महिन्यांनी रिझर्व्ह बँकेने त्या बँकेची वार्षिक तपासणी (इन्स्पेक्शन) केली . त्या तपासणीच्या अहवालात असे नमूद केले गेले की बँकेने केलेली व बँकेच्या ऑडिटर्सनी प्रमाणित केलेली नफ्याची गणना योग्य नसून, रिझर्व्ह बँकेच्या निरीक्षकांनी केलेल्या गणनेप्रमाणे सदर बँकेला त्या वर्षात चक्क तोटाच झाला आहे. कारण, रिझर्व्ह बँकेच्या मते, बँकेने नफातोटा पत्रकात केलेल्या काही तरतूदी या आवश्यकतेपेक्षा खूपच कमी केलेल्या होत्या. रिझर्व्ह बँकेच्या निरिक्षकांनी केलेल्या गणनेप्रमाणे बँकेचा नफा हा, बँकेच्या ऑडिटेड नफातोटा पत्रकात दाखवलेल्या नफ्यापेक्षा काही प्रमाणात कमी/(जास्त?) असणे, हे अनेकदा अनुभवास येत असते. पण या बँकेच्या प्रकरणात बँकेच्या ऑडिटर्सनी सुमारे वीसेक कोटींचा नफा प्रमाणित केलेला असताना, रिझर्व्ह बँकेच्या निरीक्षकांनी ती बँक त्या वर्षी काही कोटींनी तोट्यात होती असा निष्कर्ष काढला.

म्हणजे आता असे झाले की रिझर्व्ह बँकेच्या इन्स्पेक्शननुसार सदर सहकारी बँकेला तोटा असताना, दरम्यानच्या काळात त्या बँकेकडून लाभांश पण वितरित केला गेला. असे होणे तर खूपच चुकीचे ठरते. कारण सहकारी बँकांनी त्या त्या वर्षीच्या नफ्यातूनच लाभांश देणे बंधनकारक असते. बँकेला संचित नफ्यातून लाभांश देताच येत नाही. पण मग अशा परिस्थितीत कुठला नफा खरा मानायचा ?

त्या बँकेच्या प्रदीर्घ इतिहासात ऑडिट आणि रिझर्व्ह बँक इन्स्पेक्शन या दोन्हींमधे केलेल्या गणनांमध्ये, अशा प्रकारचे, एवढ्या मोठ्या रकमांचे फरक (डायव्हर्जन्स) याआधी कधीही अनुभवास आले नव्हते. गेल्या काही वर्षांत, रिझर्व्ह बँकेकडून नानाविध छोट्यामोठ्या कारणांवरून इतक्या सहकारी बँकांना दंड (पेनल्टी) लावला जात असताना, या बँकेस तोपर्यंत कधीच, कुठल्याही कारणाने, किरकोळही दंड लावला गेला नव्हता. आणि अचानक ही अशी परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतर, त्या निरीक्षण अहवालाच्या परिणाम स्वरूप उद्भवणारे, काही निर्बंध/ निर्देश, हेही रिझर्व्ह बँकेकडून सदर बँकेवर लावले गेले.

अजूनही काही बँकांच्या बाबतीत असे घडल्याचे समजते की रिझर्व्ह बँकेच्या निरीक्षकांनी गणना केलेला त्यांचा वार्षिक नफा हा त्यांच्या ऑडिटेड नफ्यांपेक्षा खूपच, म्हणजे काही कोटींनी वगैरे, कमी झाला. सदर बँकांचे अनुभवी व प्रशिक्षित व्यवस्थापन, त्यांचे अंतर्गत लेखापरीक्षक तसेच वैधानिक लेखापरीक्षक, या सर्वांनाच रिझर्व्ह बँकेच्या निरीक्षकांनी केलेल्या नफा गणना हया अयोग्य किंवा अनावश्यक पद्धतीने केलेल्या वाटत आहेत. त्यांतील एका बँकेने रिझर्व्ह बँकेकडे भरपूर पाठपुरावा केल्यानंतर रिझर्व्ह बँकेने त्यांची नफागणना खूपच बदलून, बऱ्यापैकी कमी फरकाची अशी गणना मान्य केली असेही समजते. असो.

पण या सगळ्या अनुभवांवरून काही अत्यंत महत्त्वाचे आणि मूलभूत स्वरूपाचे मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्द्यांचा अगदी संक्षिप्त असा आढावा खालील परिच्छेदांमधे घेतला आहे.

**१) रिझर्व्ह बँकेच्या निरीक्षण अहवालांसंबंधात व त्यांवर आधारित दिल्या जाणाऱ्या आदेशांबाबत दाद मागण्याची विहित रचना असावी :-** आपल्या देशात, साधारणपणे सर्वच प्रशासक आणि नियामक संस्था यांतील अधिकाऱ्यांकडून, पारित होणाऱ्या कुठल्याही आदेशांच्या बाबतीत, त्यांचा पुनर्विचार दुरुस्ती यांसाठी अर्ज करणे, तसेच त्यांच्याविरुद्ध दाद मागणे (Making review petitions, rectification petitions, and contesting them in appeals) इत्यादी व्यवस्था ह्या, त्या त्या प्रशासनांच्या अंतर्गत केलेल्या आहेत. मात्र रिझर्व्ह बँकेत अशा कुठल्याही व्यवस्थाच नाहीत. रिझर्व्ह बँकेच्या कुठल्याही अधिकाऱ्यांनी एकदा का पांढऱ्यावर काळे केले, की जणू ते पूर्णपणे अचूक आहे, सर्वार्थाने परिपूर्ण आहे आणि अंतिम सत्य आहे असा पवित्रा रिझर्व्ह बँकेत अनेकदा अनुभवास येत असतो. त्याबाबतीत दाद-फिर्यादींची औपचारिक अशी, सर्वज्ञात आणि उद्घोषित (formally codified publicly announced) व्यवस्था कुठलीही नाही. हायकोर्टात/ सुप्रीम कोर्टात रिट पिटिशन करणे हा एक भक्कम पर्याय आहे, पण तो एकेकट्या बँकेसाठी, अनेक अर्थांनी, 'परवडणारा/ झेपणारा' नसतो. त्यांमुळे दाद-फिर्यादीच्या अशा नियमित व्यवस्था रिझर्व्ह बँकेच्या अंतर्गत लवकरात लवकर तयार होणे हे अत्यावश्यक वाटते.

**२) रिझर्व्ह बँकेची 'तूच मांडिसी, तूच मोडिसी' अशी अजब पद्धत :-** मुळातच, गेल्या काही वर्षांपासून, नागरी सहकारी बँका या त्यांच्या स्वतःच्या मर्जीनुसार व निवडीप्रमाणे वैधानिक लेखापरीक्षक( स्टॅच्युटरी ऑडिटर्स) नेमूच शकत नाहीत. सहकारी बँकांनी निवडलेल्या किमान दोन लेखापरीक्षक संस्थांची नावे त्या बँकांनी रिझर्व्ह बँकेकडे कळवायची असतात. त्या नावांना मंजुरी देण्यासाठी रिझर्व्ह बँकेचे स्वत:चे असे काही व्यावसायिक निकष आहेत. त्या निकषांनुसारच रिझर्व्ह बँकेकडून त्या नावांना मंजुरी दिली जाते. सदर मंजुरी नंतरच व त्यानुसारच बँकांना वैधानिक लेखापरीक्षकांची (स्टॅच्युटरी ऑडिटर्सची) नियुक्ती करता येते. अशा प्रकारे, एका अर्थाने, रिझर्व्ह बँकेने स्वतःच नेमलेल्या ऑडिटरने प्रमाणित केलेली नफागणना व अन्यही आर्थिक आकडेवारी स्वीकारणे हे रिझर्व्ह बँकेला मान्य का नसावे?

**३) मग या ऑडिटर्सचा नेमका उपयोग काय? :-** ज्यांच्या नेमणुकीस स्वतः रिझर्व्ह बँकेनेच मंजुरी दिली आहे, अशा ऑडिटर फर्म्स या सी.ए. (चार्टर्ड अकौंटंट्स) पदवी घेतलेल्या

**पुढील पानावर...**

व्यक्तींच्या, दीर्घानुभवी अशा, नामांकित संस्था असतात. या देशात हिशोब तपासणी करण्यासाठी (लेखापरीक्षणासाठी) ज्यांना अधिकृत केले गेले आहे, संसदेने ज्यांच्या संबंधी स्वतंत्र कायदे केले आहेत, अशा चार्टर्ड अकौंटंट्स मंडळींनाच हे लेखापरीक्षण करता येते. अशा ऑडिटर फर्म्सनी केलेल्या लेखापरीक्षणासाठी साहजिकच ऑडिट फी पण द्यावीच लागते. सहकार कायद्याखालील तरतुदींनुसार त्या फीची गणना होत असते.

सदर कामाची व्याप्ती आणि त्यातील जोखीम-जबाबदारी विचारात घेऊन ठरवल्या जाणाऱ्या या फीची रक्कम ही बऱ्यापैकी मोठी असते. मग हे सर्व करून, सदर ऑडिटर्सनी प्रमाणित केलेली आकडेवारी रिझर्व्ह बँक स्वीकारणारच नसेल, तर ह्या सगळ्या औपचारिकता आणि हे सगळे खर्च बँकांनी नेमके करायचे तरी कशाकरता? रिझर्व्ह बँकेचे इन्स्पेक्शन हे जणू सर्वंकष रि-ऑडिट (पूर्णतः पुनर्तपासणी) ठरणार असेल तर मग या ऑडिट्सचे प्रयोजन काय आणि किती उरते? या ऑडिट्समुळे केवळ सहकार कायद्याखालील तरतुदींची एक पूर्तता झाली एवढेच समाधान अपेक्षित आहे का?

**४) रिझर्व्ह बँकेच्या तपासणी नंतरच नफा विभागणी व लाभांश वितरण अंतिम** (final) **करणे श्रेयस्कर ठरेल का? :-** नफा वितरणाला वार्षिक सभांमध्ये मंजुरी घेताना ती रिझर्व्ह बँकेच्या तपासणीच्या अधीन राहून (Subject to RBI inspection) अशीच घ्यावी व लाभांश वितरणही सदर तपासणी अहवालातील गणनांनंतरच व त्यानुसारच करावे हे अधिक योग्य राहील का? पण मग, ज्या सहकारी बँकांचे रिझर्व्ह बँक इन्स्पेक्शन दरवर्षी होत नाही त्यांनी काय करावे ?

**५) आवश्यक अशी हिशोब दुरूस्ती अपेक्षित नाही का? :-** स्टॅच्युटरी ऑडिट आणि आरबीआय इन्स्पेक्शन यांच्या या स्वतंत्र आणि समांतर रचनांमधे हा एक महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षित रहातो आहे. प्रथमतः एका उदाहरणावरून हा मुद्दा समजून घेऊ या. एखाद्या बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षणानुसार तिला २० कोटींचा नफा झाला आहे. सहकार कायद्यांतील तरतुदींनुसार, त्याच्या २५ टक्के, म्हणजे ५ कोटी राखीव निधीकडे वर्ग करण्यात आले आहेत. त्यानंतर रिझर्व्ह बँकेच्या निरिक्षकांनी BDDR (संशयित आणि बुडित कर्जांसाठीच्या) किंवा S.R. (सेक्युरिटी रिसीट्स) इत्यादीसाठीच्या तरतुदी या २१ कोटींनी अधिक असायला हव्या होत्या, व म्हणून नफा ४ कोटीच आहे असे ठरवले. तर मग नफ्याच्या २५ टक्के ह्या हिशोबाने, केवळ १ कोटीच राखीव निधीकडे वर्ग होणे आवश्यक ठरते. अशा परिस्थितीत त्या निधीकडे वर्ग झालेले जास्तीचे ४ कोटी हे राखीव निधीमधून BDDR कडे वर्ग होणे आवश्यक नाही का? कायद्यांनुसार अन्यही निधींकडे वर्ग झालेल्या रकमांबाबतही हे असे करणे क्रमप्राप्त ठरत नाही का ? पण असे करण्यासाठी आता रिझर्व्ह बँकेची वेगळी परवानगी लागते. अशा परवानग्या मात्र सहसा/सहजपणे दिल्या जात नाहीयेत असा अनुभव काही बँकांच्या बाबतीत येत आहे. खरं तर, या पुढील काळात, अशा परिणामस्वरूप दुरूस्त्यांसाठी (consequential rectifications resulting out of RBI inspections) रिझर्व्ह बँकेने योग्य त्या कॉमन गाइडलाइन्स जाहीर करणे आवश्यक वाटते. अन्यथा वैधानिक लेखापरीक्षण आणि रिझर्व्ह बँक इन्स्पेक्शन ह्या अशाच, समांतर पद्धतीने चालू रहाणाऱ्या, दोन स्वतंत्र औपचारिकता ठरत रहातील.

**६) रिझर्व्ह बँक इन्स्पेक्शन रिपोर्ट्स वार्षिक सभांच्या आधीच मिळणे शक्य करता येईल का? :--** कायद्यांनुसार, सहकारी बँकांच्या वार्षिक सभा या ३० सप्टेंबर पर्यंत घ्याव्या लागतात. सर्वच सहकारी बँकांनी आपापले वैधानिक लेखापरीक्षण एप्रिल ते जून या तिमाहीमध्ये पूर्ण करून घेऊन, त्यानंतर लगेचच रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा करून त्यांचे इन्स्पेक्शनही करून घ्यावे व त्याचे अहवाल प्राप्त करून घ्यावेत, असे करणे हिताचे ठरेल का? सदर अहवालांतील निरीक्षणांनुसार प्रस्तावित नफा विभाजनांत आवश्यक ते बदलही करता येतील. अर्थात, सर्वच सहकारी बँकांचे इन्स्पेक्शन अहवाल ऑगस्ट अखेर/सप्टेंबरच्या सुरुवातीपर्यंत मिळण्यासाठी रिझर्व्ह बँकेलाही आवश्यक ते प्रशिक्षित मनुष्यबळ आणि अन्य रचना उभ्या कराव्या लागतील. सध्याचा अनुभव तर असा आहे की इन्स्पेक्शन पूर्ण झाल्यानंतरही, बरेच दिवस विविध प्रकारची माहिती आणि आकडेवारी बँकांकडून पुन्हा पुन्हा मागितली जात आहे. त्यासंबंधीच्या बहुअंशी इ-मेल्समध्ये बँकांनी सदर माहिती ही EOD (End of day) पर्यंत द्यावी असे लिहिलेले असते. बँकांनी ती सगळी माहिती तत्परतेने देऊनही, रिझर्व्ह बँकेकडून इन्स्पेक्शनचे अहवाल मिळण्यासाठी मात्र, अनेकदा दोनचार महिन्यांचा कालावधी पण लागत आहे. या कार्यपद्धती मधे बदल होणे आवश्यक आहे. असो.

सहकारी बँका, त्यांच्या राज्यस्तरीय व देशस्तरावरील संघटना, प्रत्यक्ष रिझर्व्ह बँक, राज्य सरकारे व केंद्र सरकार अशा सर्वांनी मिळून यावर गांभीर्याने विचारविनिमय करणे खूपच आवश्यक वाटते. तो तसा होईल, अशी आशा करू या!

**- सी.ए.उदय म. कर्वे,**
उपाध्यक्ष, कोकण नागरी सहकारी बँक्स असोसिएशन
Email : umkarve gmail.com
मोबाइल - ९८१९८६६२०१

*****



# भविष्यातील ऑनलाईन डिजिटल क्रांतींचे फलित...

भारतीय रिझर्व्ह बँक, देशातील बँकिंग क्षेत्राची नियामक म्हणून काम करते. नियामक म्हणून काम करीत असताना रिझर्व्ह बँक, नागरी सहकारी बँकांसोबत, सर्व बँकांच्या विकासासाठी काम करतात. बँकिंग सेवेबाबत मार्गदर्शक सूचना, परिपत्रके जारी करून, त्यानुसार बँका काम करतात का? ह्यावर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असते. नियमांचे उल्लंघन केल्यास, कठोर शासन करण्याचे काम देखील भारतीय रिझर्व्ह बँक करते. ह्या सोबतच रिझर्व्ह बँक, ग्राहकांना कशी तत्पर सेवा देता येईल यांचे निरंतर संशोधन करीत असते. याचे फलित म्हणजे ग्राहकांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून करता येणारे आर्थिक व्यवहार होत. बँकेच्या कोणत्याही शाखेत न जाता, कोणत्याही वेळी, कुठूनही आर्थिक व्यवहार करण्याची सोय इलेक्ट्रॉनिक माध्यमातून झाली. आज देशभरातील जवळपास सर्वच बँकांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून आर्थिक व्यवहार करण्याची सुविधा आपल्या खातेदारांना उपलब्ध करुन दिली आहे. पतसंस्था देखील आज खातेदारांना ऑनलाईन व्यवहार करण्याची सुविधा उपलब्ध करून देत आहे.



**किशोर शितोळे**
**९८२२०९९८८१**

प्रत्येक बँक आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी., इ-कॉमर्स, पी.ओ.एस, यू.पी.आय. यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देते. परंतु आजही अनेक ग्राहक ह्या सेवा वापरत नाहीत. कारण त्यांच्या मनात रुजलेली पारंपरिक बँकिंग पद्धत व ऑनलाईन सेवा वापरणे विषयी भीती हे आहे. त्यामुळे बँका जरी ऑनलाईन बँकिंग सेवा उपलब्ध करून देत असतील, तरी बहुसंख्य ग्राहक ह्या सेवा वापरत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

● **ऑनलाईन व्यवहारावर भर हवा –** बँक म्हणून आपण ऑनलाईन व्यवहार करण्यास ग्राहकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. ज्यामुळे काउंटर होणारी गर्दी कमी होऊन, वेळेची बचत होईल आणि हा वेळ व्यवसायवाढीसाठी वापरू शकतो. ऑनलाईन व्यवहारांना चालना देण्यासाठी खालील काही मुद्यांचा विचार करता येईल.

✲ बँकांनी त्यांच्याकडे एकूण खाती किती आहेत, त्यापैकी किती खातेदार ऑनलाईन सेवांचा उपभोग घेतात ह्याचा आढावा घ्यावा.

✲ जे खातेदार ऑनलाईन सेवांचा उपभोग घेत नाहीत, त्यांना ऑनलाईन सेवा वापरण्याचा आग्रह धरावा.

✲ अशा खातेदारांची यादी तयार करावी, त्यांचे मोबाईल बँकिंग रजिस्ट्रेशन करून, ॲपद्वारे ऑनलाईन व्यवहार कसे करावेत, ॲपद्वारे करण्यात येणार व्यवहार कसे सुरक्षित आहेत, किती रुपयांपर्यंत आपण रक्कम ट्रान्सफर करू शकता, ॲप वापरण्यात काय जोखीम आहे, ॲप वापरताना कोणती काळजी घ्यावी इत्यादी बाबींची यादी करून, त्या खातेदारांना पटवून देता येतील. ह्या कामाची शाखेतील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडे जबाबदारी द्यावी. बँक ह्या कामास कंत्राटी कर्मचारीदेखील नियुक्त करू शकतात, परंतु तो कर्मचारी विश्वासाई असावा अन्यथा तो खातेदाराची फसवणूक करू शकतो.

✲ व्यवस्थापनाने शाखांना व्यवसायाचे उद्दिष्ट देताना, ऑनलाईन व्यवहार वाढविण्यासाठी मोबाईल बँक रजिस्ट्रेशन करून घेण्याचे देखील उद्दिष्ट्ये दिले पाहिजे. जेणे करून, शाखाधिकारी स्वतः लक्ष देऊन, उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील.

✲ ऑनलाईन सेवेत येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारावी. कॉल सेंटर / टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून द्यावा.

✲ ऑनलाईन सेवा देत असल्यामुळे नवी पिढी आपोआपच बँकेशी जोडली जाईल.

✲ बँकेच्या चालू खातेदारांना, त्यांच्या खात्यांचा क्यूआर कोड देता येईल. ज्यामुळे त्याला व्यवसायातून मिळणारे पैसे थेट बँकेकडे जमा होतील, पर्यायाने व्यवसाय वाढीस मदत होईल.

● **युवकांची मानसिकता लक्षात घ्यावी –** ✲ येणारी पिढी ऑनलाईन बँकिंग सेवा देत नसलेल्या बँकेत खाते उघडण्यास जाईल की नाही अशी शंका आहे. परंतु सध्या जो ग्राहकवर्ग आपल्याकडे आहे, त्यांना ऑनलाईन साक्षर करून, आपण डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन नक्कीच देऊ शकतो.

ऑनलाईन व्यवहाराची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. गूगल-पे, फोन-पे, पेटीएम व अन्य वॉलेट पेमेंट ह्या माध्यमांनी ऑनलाईन व्यवहारांची लोकप्रियता वाढविली आहे. ऑनलाईन व्यवहार करण्यास आकर्षित करण्यासाठी, विविध प्रकारचे डिस्काउंट कुपन, कॅश बँकचे आमिष सुरुवातीला देण्यात आले. यामुळे ऑनलाईन पेमेंट करण्याची सवय लोकांमध्ये रुजली. यूपीआय सेवेने ऑनलाईन व्यवहारास अधिक चालना देण्याचे काम केले आहे. पुढील काही काळात, सर्वच व्यवहार ऑनलाईन पद्धतीने होतील.

ऑनलाईन व्यवहार करताना. डिजिटल फ्रॉड हे एक आव्हान आहे. येणाऱ्या काळात त्याची तीव्रता आणखी वाढू शकते. परंतु समाधानाची बाब म्हणजे येणाऱ्या काळात लोक देखील अधिक साक्षर होतील. त्यामुळे त्यांना सहज फसविणे शक्य होणार नाही.

**लेखक – किशोर शितोळे**
**(अध्यक्ष, देवगिरी सहकारी बँक)**
**मो.नं.– ९८२२०–९९८८१**
Email- shitolekishoregmail.com

✲✲✲✲✲

---

# जिजामाता सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची सांगता

**पुणे –** सहकारी संस्थांच्या संचालकांनी मालक म्हणून काम न करता विश्वस्ताच्या भूमिकेतून काम करावे तरंच संस्था टिकणार आहे, असे मत पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते यांनी येथे सांगितले. जिजामाता सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची सांगता झाली, त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय संस्थेचे संचालक डॉ. यशवंत पाटील, आरबीआयचे माजी व्यवस्थापक अरविंद नाईक, बँकिंग तज्ञ विद्याधर अनास्कर, बँक अध्यक्षा रत्नमाला म्हस्के, उपाध्यक्ष सुरेखा शितोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी उमाकांत मुंगी, सहायक उपनिबंधक निलम पिंगळे व्यासपीठावर होते. बँकेच्या सुवर्ण महोत्सवी स्मरणिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

मोहिते यांनी सांगितले, सहकारी बँकांसमोर स्मॉल फायनान्स आणि खासगी बँका यांचे आव्हान आहे. जुन्या पिढीला जपण्याबरोबर नवीन पिढीला जोडण्याचे आव्हान आहे.

बँक स्थापनेचा हेतू साध्य झाला का याचा विचार संचालकांनी करावा असे ते म्हणाले.




# जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेने विकसित केले 'मोबाईल ॲप'

**नगर** – मोबाईल ॲप विकसित करण्याचा यशस्वी प्रयत्न येथील जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेने केला आहे. या नवीन प्रणालीचे उद्घाटन आरबीआयचे संचालक आणि सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे यांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षक नेते बापूसाहेब तांबे अध्यक्षस्थानी होते. असा यशस्वी प्रयोग करणारी ही पहिली बँक असणार आहे.

सहकार भारतीचे राज्य सचिव मधुसूदन पाटील, कोकण विभाग सहविभाग प्रमुख राजू ठाणगे, शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष केशव जाधव, उपाध्यक्ष दत्ता पाटील आदी उपस्थित होते. मराठे यांनी मनोगतात बँकेच्या नवीन प्रयोगाचे स्वागत केले. ते म्हणाले बँकेचे कार्य समाधानकारक असून यापुढील काळात बँकेला जे सहकार्य लागेल ते देण्याची तयारी आहे. यावेळी बँकेला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

बँकेचे माजी अध्यक्ष संदीप मोटे, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बबन गाडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. बँक अध्यक्ष रामेश्वर चोपडे यांनी प्रास्ताविकात योजनेची माहिती सांगितली. संचालक कारभारी बाबर यांनी स्वागत तर कार्यकारी अध्यक्ष नारायण पिसे यांनी आभार मानले.

## सहकाराच्या विस्तारासाठी सर्व घटकांचे योगदान आवश्यक - आरबीआय संचालक मराठे



**धुळे** – देशातील सहकार क्षेत्राच्या विस्तारासाठी समाजातील सर्वच घटकांचे योगदान आवश्यक आहे, असे मत आरबीआय संचालक सतीश मराठे यांनी व्यक्त केले आहे. दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटट्स ऑफ इंडिया आणि धुळे सहकार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. सहकाराचे सशक्तीकरण आणि भवितव्य हा परिषदेचा विषय होता.

मराठे यांनी आपल्या भाषणात देशातील सहकार चळवळीचा आजवरचा आढावा घेतला. तसेच आणि भविष्यातील वाटचालीबाबत सविस्तर विवेचन केले. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उपनिबंधक मनोज चौधरी होते. परिषदेत सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र, सहकारी संस्थासाठी आयकर आकारणी आणि रचना, संस्थासाठी लेखा परीक्षण अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी मनोगत व्यक्त केली. सहकार भारती जिल्हा अध्यक्ष आशिष अग्रवाल यांनी स्वागत करून प्रास्ताविकात परिषदेच्या आयोजनामागची भूमिका मांडली. या चर्चासत्रासाठी जिल्ह्यातील सहकार भारतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सहकारी बँकांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अवैध मासेमारीच्या विरोधात कारवाई करणार - मत्स्यव्यवसाय मंत्री मुनगुंटीवार



**मुंबई** – मच्छिमार बांधव पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत अवैध मासेमारी करत आहेत. त्यांच्यावर कडक कारवाई करण्या बाबतचे निवेदन महाराष्ट्र मच्छिमार कृति समिती च्या शिष्टमंडळाने मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना दिले आणि कठोर कारवाईबाबत सक्षम कायदे करण्यात यावेत, अशी मागणी केली. याबाबत कडक कारवाई करण्याचे आश्वासन मुनगंटीवार यांनी दिले. विधान भवनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन दिले. शिष्टमंडळात समितीचे कार्याध्यक्ष, रामकृष्ण तांडेल, सरचिटणीस, किरण कोळी, खजिनदार परशुराम मेहेर, पालघर महिला संघटक ज्योती मेहेर, मरोळ बाजार अध्यक्षा, राजश्री भानजी, ठाणे जिल्हा मच्छिमार समाज संघाचे उपाध्यक्ष प्रमोद आरेकर, सदस्य भुवनेश्वर धनु, मच्छिमार संस्था अध्यक्ष, जयेश भोईर, प्रफुल्ल तांडेल, प्रवीण तांडेल, रवींद्र पांचाळ, गौरव पाटील, प्रतिभा भाटे यांचा समावेश होता.

# सहकारी पतसंस्था संरक्षण योजनेतील त्रुटी दूर करण्याची आवश्यकता

## राज्य सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्ष काका कोयटे यांची मागणी



**पुणे –** राज्य शासनाने सहकारी पतसंस्थांमधील ठेवीदारांसाठी जी ठेव संरक्षण योजना तयार केली आहे, त्यामध्ये त्रुटी असून ती अव्यवहार्य आहे. त्याबाबत नव्याने फेरविचार करण्याची आवश्यकता असल्याचे राज्य सहकारी पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे यांनी सांगितले.

ते म्हणाले की, नवीन योजनेत अनेक त्रुटी आहेत. त्यामुळे ठेवीदारांना लाभ मिळणार नाही परिणामी अनेक पतसंस्थांनी याला विरोध दर्शविला आहे. पतसंस्थांना ठेव संरक्षण लागू करण्यात यावे अशी मागणी महासंघाच्या वतीने करण्यात आली होती. त्यामुळे शासनाच्या योजनेचे महासंघाने स्वागत केले होते. मात्र सहकार खात्याने परिपत्रक काढून पतसंस्थांना ०.१० टक्के अंशदानाची मागणी केली. या योजनेतून ठेवीदारांना मिळणाऱ्या लाभासाठीच्या पात्रतेबाबत कोणतेही निकष जाहीर करण्यात आले नाहीत.

याआधी शासनाने पतसंस्थांसाठी डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशन व स्व. दीनदयाळ उपाध्याय ठेव संरक्षण योजना जाहीर केली होती. त्यामुळे शासनाने नवीन योजनेतील त्रुटी दूर करण्याबाबत फेरविचार करावा, यासाठी राज्य पतसंस्था महासंघ, जिल्हा पतसंस्था महासंघ आणि सहकार भारती यांच्याबरोबर चर्चा करून निर्णय घेतला जावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सहकार खात्याच्या निकषानुसार या योजनेसाठी पतसंस्थांनी २५ टक्के वैधानिक तरलता राखणे बंधनकारक आहे. मात्र राज्यातील ५२ टक्के पतसंस्थांची वैधानिक तरलता २५ टक्क्यांपेक्षा कमी आहे. परिणामी निम्म्या पतसंस्था योजनेस अपात्र ठरणार आहेत. पतसंस्थांकडे पुरेसा निधी जमा न झाल्यास ठेवीदारांना योजनेचा लाभ मिळणार नाही.

ठेव संरक्षण योजनेस राज्य सहकारी पतसंस्था महासंघाचा विरोध नाही. मात्र त्यामध्ये काही त्रुटी असून कार्यपद्धतीला विरोध आहे. पतसंस्थानी अंशदान दिल्यास सरकारने ठेवीदारांच्या रकमेच्या संरक्षणाची हमी घ्यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

## हर घर सौर उर्जा प्रकल्प आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेचा उपक्रम



**इचलकरंजी –** हर घर सौर उर्जा प्रकल्प असा अभिनव उपक्रम आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेने हाती घेतला असून त्यासाठी कर्जाची उपलब्धता करण्यात येणार आहे. बँक अध्यक्ष स्वप्निल आवाडे यांनी बँकेच्या ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही माहिती सांगितली.

उपक्रमासाठी पांच लाख रुपयांचे कर्ज मागेल त्याला उपलब्ध करून देण्यात येणार आहे असे नमूद करून ते म्हणाले, शहराला विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविण्यासाठी बँकेच्या वतीने प्रत्येक घरासाठी सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. मागील आर्थिक वर्षात बँकेने ५३ कोटी ढोबळ नफा मिळविला असून बँकेचा स्वनिधी ३०० कोटी रुपये इतका झाला आहे. आगामी वर्षभरात एकूण व्यवसाय ५ कोटी करण्याचे उद्दिष्ट असणार आहे. आगामी काळात १०० टक्के नेट बँकिंग वर भर देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

आमदार प्रकाश आवाडे यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शिरगावे यांनी नोटीसीचे वाचन तर उपाध्यक्ष संजय अनिगोळ यांनी आभार मानले.

## कॉसमॉस बँकेला ३८४ कोटींचा निव्वळ नफा




**पुणे –** नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात कॉसमॉस बँकेला ३८४ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे अशी माहिती बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे यांनी सांगितली. बँकेची वार्षिक सर्व साधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली. सदस्यांसाठी १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे.

बँकेचा एकूण निधी २१.४९ कोटी आहे. बँकेच्या ठेवी २०,२१६ कोटी रुपये झाल्या असून १५,१९२ कोटीचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. बँकेचा एकूण व्यवसाय ३५.४०० कोटींपेक्षा अधिक झाला आहे अशी माहिती यावेळी सांगण्यात आली. सभेला बँक पदाधिकारी, संचालक, ग्राहक उपस्थित होते.

## गृहनिर्माण संस्था, अपार्टमेंटचे प्रश्न सोडविण्यासाठी सहकार दरबार उपक्रम उपयुक्त

**पुणे –** गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी सहकार दरबारसारखे उपक्रम उपायुक्त असल्याचे मत सहकारी संस्था उपनिबंधक डी. एस. हौसारे यांनी व्यक्त केले आहे. पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ शाखा कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. राज्य गृहनिर्माण महासंघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन आदी पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात सोसायटी आणि अपार्टमेंट मधील विविध प्रश्न, सोसायटी रिडेव्हलपमेंट, सोसायटी देखभाल खर्च, कचरा व्यवस्थापन आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. चैतन्य पुरंदरे यांनी सूत्रसंचालन आणि राजश्री वाघमारे यांनी आभार मानले.

## श्री तिरुपती पतसंस्थेची नवी सांगवी शाखा कार्यरत

**पुणे –** येथील श्री तिरुपती पतसंस्थेच्या नवी सांगवी येथील शाखेचे उद्घाटन नुकतेच अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंदगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. या संस्थेने घनकुबेर नागरी सहकारी पतसंस्थेचे नुकतेच विलीनीकरण करून घेतले आहे, या शाखेचे उद्घाटन झाले आहे. संस्थेचे अध्यक्ष संतोष चोपडा यांनी सांगितले की, संस्थेचे भाग भांडवल ३ कोटी ३६ लाख असून ठेवी ११८ कोटी ६८ लाख आहेत. तसेच गुंतवणूक ४५ कोटी ५६ लाख, कर्ज ८६ कोटी ५१ लाख खेळते भांडवल १४७ कोटी ७३ लाख इतके आहे. संस्था स्थापनेपासून लेखा परीक्षणात सतत 'अ' वर्ग मिळाला आहे. संस्थेने तीन संस्थांचे विलीनीकरण करून घेतले आहे, असे ते म्हणाले.

# महिला उद्योजिकांच्या सक्षमीकरणासाठी पंढरपूर अर्बन बँकेचा उपक्रम



**पंढरपूर –** दि. पंढरपूर अर्बन को-ऑप. बँकेने महाराष्ट्र शासनाचा उपक्रम आई महिला केंद्रीत पर्यटन धोरणा अंतर्गत व्याज परतावा कर्ज योजना मेळावा घेण्यात आला. बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे अध्यक्षस्थानी होते. यावेळी आई महिला केंद्रीत पर्यटन धोरणांतर्गत व्याज परतावा कर्ज योजनेची माहिती डॉ. संगिता पाटील यांनी सांगितली.

पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजिकांचे सक्षमीकरण करण्यासाठी आई महिला केंद्रीत पर्यटन धोरणा अंतर्गत व्याज परतावा कर्ज योजना (फक्त महिलांसाठी) राबविण्यात येत आहे. या योजनेतून कृषी पर्यटन केंद्र, हॉटेल व्यवसाय, रेस्टॉरंट, फॅके, उपहारगृह, फास्टफूड, ट्रॅव्हल एजंट, टूर ऑपरेटर, टूर ट्रॅव्हल्स एजन्सी, हाऊस बोट, टेंट हाऊस, पर्यटन व्हिला, साहसी पर्यटन केंद्र, होम स्टे, रिसॉर्ट, ट्री-हाऊस, आदिवासी/निसर्ग पर्यटनाशी संबंधित प्रकल्प, मेडिकल पर्यटन, वेलनेस सेंटर, योगा केंद्र असे पर्यटन क्षेत्राशी संबंधित व्यवसायासाठी कर्जपुरवठा केला जातो.

प्रास्ताविक हरीष ताठे यांनी तर आभार गणेश हरिदास व निरंजन रूपलग यांनी मानले. बँकेचे अध्यक्ष सतिश मुळे, संचालक हरिष ताठे, अमित मांगले, ऋषिकेश उत्पात, डॉ. संगिता पाटील, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे, आनंदा नाईकनवरे कर सल्लागार व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# अजिंक्यतारा कारखान्यामुळे ऊस उत्पादकांचे जीवनमान उंचावले

**सातारा –** अजिंक्यतारा कारखान्याची उभारणी झाल्यामुळे सातारा व आसपासच्या तालुक्यातील शेतकरी आर्थिक उन्नतीच्या प्रवाहात आले. या कारखान्यामुळे हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावले आहे, असे कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके यांनी सांगितले.

अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याच्या वतीने कारखाना कार्यक्षेत्रातील ६१६ शेतकऱ्यांच्या शेतावर पर्यावरण पूरक खोडवा ऊस व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक राबवण्यात आले. त्यासंदर्भात कारखाना कार्यस्थळावर ऊस पीक शेतकरी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत बदलत्या हवामान परिस्थितीत पर्यावरणपूरक खोडवा उसाच्या शाश्वत व विक्रमी उत्पादन वाढ या संदर्भात डॉ. फाळके, पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्रातील कीड व रोग शास्त्रज्ञ डॉ. सूरज नलावडे, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कृषी अधिकारी अमृत भोसले यांनी मार्गदर्शन केले.

ग्लोबल वॉर्मिंग, पर्यावरणातील बदल जाणून घेऊन शेतीमध्ये आमूलाग्र बदल झाला पाहिजे. उसाचे उत्पादन कमी होते आणि खर्च वाढतो, अशी ओरड आपण ऐकत असतो. शेतीमध्ये क्रांती घडली तरच देशाची प्रगती होणार आहे. खोडवा ऊस पीक हे काटक असल्याने वातावरणातील ताण तणाव सहजरीत्या सहन करते.

अनियमित ऊस लागवड, दुर्लक्षित लागवड तंत्रज्ञान, जमिनीचे बिघडलेले आरोग्य याचा सारासार विचार करून असे प्रकार घडू नयेत याची काळजी घेतली पाहिजे. अमर्यादित पाणी वापर कटाक्षाने टाळला पाहिजे. शेतीसाठी ठिबक सिंचन पद्धतच वापरली गेली पाहिजे, असे डॉ. फाळके यांनी सांगितले. ऊस पिकावरील विविध प्रकराची कीड, रोग आणि त्यासाठीचे नियंत्रण, औषध फवारणी तसेच पिकाची घ्यावयाची काळजी याबाबत डॉ. सूरज नलावडे यांनी सांगितले शेती अधिकारी विलास पाटील यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# शालांत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




**सांगली –** शालांत परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थी जे. जी. पाटील मेमोरियल फौंडेशनतर्फे सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून महाराणी देवी अहिल्याबाई होळकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. आर. एस. चोपडे व सांगली अर्बन को-ऑप. बँकेचे अध्यक्ष गणेश गाडगीळ, सांगली अर्बन को- ऑप. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, फौंडेशनचे अध्यक्ष संजय पाटील, सचिव एच. वाय. पाटील होते.

प्रास्ताविक फौंडेशनचे सचिव एच.वाय. पाटील यांनी केले. फौंडेशनचे विश्वस्त व सांगली अर्बन को-ऑप. बँकेचे अध्यक्ष गाडगीळ यांनी मनोगत व्यक्त केले. परीक्षेत ९९.६० टक्के गुण प्राप्त केलेल्या कुमारी तेजस्वी अप्पासाहेब बागडी तसेच इतर गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थी आणि विद्यार्थिनी अशा एकूण ४१ जणांचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.

सांगली मिरज कुपवाड महानगर पालिकेचे सेवानिवृत्त नगर सचिव चंद्रकांत आडके तसेच कासेगाव येथील जे. जी. पाटील सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश माने, सांगली अर्बन बँकेचे बत्तीस शिराळा शाखेचे निवृत्त शाखाधिकारी सुभाष पाटील यांचा फौंडेशनतर्फे सत्कार करण्यात आला. विश्वस्त संजय माने यांनी आभार मानले.

# नागरी सहकारी बँकांनी व्यवसायाबरोबर सुरक्षिततेवर भर द्यावा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या डिपार्टमेंट ऑफ सुपरव्हिजन तर्फे गव्हर्नन्स इन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, ड्रायव्हिंग सस्टेनेबिलिटी ग्रोथ अँड स्टॅबिलिटिया विषयावर अहमदाबाद येथे नागरी सहकारी बँकांसाठी कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली होती. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांचे नागरी सहकारी बँका संदर्भात सविस्तर विवेचन केले झाले. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सहकाराचे महत्त्व विशद करून, नागरी सहकारी बँकांची आवश्यकता, या बँकांची तळागाळातील खातेदारांसोबत जुळलेली नाळ, बँकिंग क्षेत्रातील नागरी सहकारी बँकांच्या अस्तित्वाचे महत्त्व या विषयावर भाष्य केले. देशातील १४७२ नागरी सहकारी बँकांपैकी ५०६ बँकांवर SAF अंतर्गत कारवाई सुरू असल्याचेही सांगितले. नागरी सहकारी बँकांपैकी ३५ टक्के बँकांवर ही कारवाई सुरू आहे, याबाबत आत्मपरीक्षणाची गरज आहे. नागरी सहकारी बँकांनी आपला व्यवसाय वाढवीत असताना सुरक्षिततेच्या मापदंडाकडे अजिबात दुर्लक्ष करू नये, व्यवसाय वाढी सोबतच नफ्यातील वाढ ही अत्यावश्यक बाब आहे  नागरी सहकारी बँकांचे ताळेबंद  सुधारणे आवश्यक आहे.



डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

*** नागरी सहकारी बँकांनी पुढील आठ मुद्द्यांवर बारकाईने लक्ष द्यावे. आठ मुद्दे आणि त्याबद्दल थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे.**

**१) क्वालिटी ऑफ गव्हर्नन्स –** बँकिंगमध्ये ठेवीदारांच्या, त्यांनी विश्वासाने ठेवलेल्या रकमांची, काळजी करणे हे बँकेचे आद्य कर्तव्य असून, याबाबतीत कोणतीही तडजोड क्षम्य नाही. रिझर्व्ह बँकेने सांगितलेल्या नियमावलीचे परिपूर्ण पालन करणे आणि याबाबतीत अद्ययावत राहणे अत्यावश्यक आहे. कम्प्लायन्स, रिस्क मॅनेजमेंट आणि इंटर्नल ऑडिट या तीन बाबींकडे बँकांनी कटाक्षाने लक्ष देणे आवश्यक आहे. रिझर्व बँकेने सांगितलेला कम्प्लायन्स हा कागदोपत्री नसावा तर तो प्रत्यक्षामध्ये केलेला असावा. रिस्क मॅनेजमेंट या तंत्राची बँकांनी परिपूर्ण माहिती करून घ्यावी, तसेच रिस्क बेस्ड ऑडिट रिझर्व्ह बँकेच्या सूचनांप्रमाणे, त्यांनी आखून दिलेल्या चौकटीतच केले जावे. अंतर्गत लेखापरीक्षण हे जाणकार व्यक्तींकडून केले जावे आणि या परीक्षणातील त्रुटींचे त्वरित निराकरण करण्यात यावे. चीफ रिस्क ऑफिसर, चीफ कम्प्लायन्स ऑफिसर यांना मार्केटिंग ऑफिसर इतके किंवा त्यापेक्षा अधिक महत्त्व दिले जावे.

**२) क्वालिटी ऑफ बोर्ड फंक्शन –** बँकेच्या संचालक मंडळाने बँकेच्या सर्वांगीण प्रगती आणि वाढीसाठी योग्य ते धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित आहे. मंडळाच्या कामात गुणवत्ता दिसून आली पाहिजे. यासाठी संचालक मंडळात वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा समावेश असला पाहिजे. तंत्रज्ञानाची माहिती असलेले संचालक, वित्तीय क्षेत्र आणि लेखापरीक्षणाची माहिती असलेले संचालक, तसेच आर्थिक विषय, बाजारपेठ याची माहिती असलेल्या संचालकांचा संचालक मंडळात समावेश असला पाहिजे. विविध क्षेत्रातील जाणकारांचे मिश्रण संचालक मंडळात असावे. सर्व संचालकांना आपले मत मांडण्याची पूर्ण संधी देण्यात यावी आणि चर्चेचे स्वातंत्र्य संचालक मंडळात असले पाहिजे. निवडून आलेल्या संचालकांव्यतिरिक्त बँकेचे व्यावसायिक पद्धतीने व्यवस्थापन व्हावे, या हेतूने बोर्ड ऑफ मॅनेजमेंटची रचना करण्यात आलेली आहे.

**३) क्रेडिट रिस्क मॅनेजमेंट –** बँकिंग व्यवसाय हा ठेवी स्वीकारून कर्ज देणे अशा स्वरूपाचा आहे. कर्ज देण्यात बँकेला मोठी जोखीम स्वीकारावी लागते. दिलेली कर्जे व्याजासह वसूल करणे, हे जोखमीचे काम आहे. यासाठी प्रत्येक कर्ज मंजूर करत असताना ते नियमांच्या चौकटीतच राहील याची काळजी घेतली गेली पाहिजे. कर्जासाठी योग्य ते तारण घेतले जावे. कर्ज मंजुरीसाठी करण्यात येणारी कागदपत्रे, शिफारस ही तंत्रशुद्ध असली पाहिजे. कर्ज दिलेल्या दिवसापासून त्या कर्जाची योग्य देखरेख (मॉनिटरिंग) होणे आवश्यक आहे. कर्ज व्यवहारातील सर्वात मोठी जोखीम, कर्ज खाते अनुत्पादक (NPA) होणे ही असते.

कर्ज खाते अनुत्पादक झाल्यास व्याज मिळणे बंद होते. तसेच त्याच्या वयानुसार त्याची नफा-तोटा खात्यातून तरतूदही करावी लागते. हा दुहेरी तोटा होऊ नये यासाठी कर्ज देतानाच पुरेशी काळजी घेणे आवश्यक आहे. कर्ज व्यवहाराचे नियंत्रण करण्यासाठी एस एम ए शून्य ते तीन अशा कर्ज व्यवहाराच्या वर्गीकरणाची पद्धत असून या पद्धतीने नुसार कर्ज व्यवहारावर नियंत्रण ठेवणे सोपे ठरू शकते.

रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांचा अभ्यास करून कोणत्याही बँकेच्या २० थकबाकीदारांची रक्कम ही बँकेच्या एकूण थकित रकमेच्या ६० टक्के असते असे निष्कर्ष काढलेले आहेत. याचा विचार करून कोणतेही खाते थकित होणार नाही, यासाठी वेळेवर प्रयत्न केले गेले पाहिजेत. तसेच थकित खात्यासाठीची तरतूद, नियम आणि कायद्यानुसार वेळेत केली पाहिजे.

**४) ट्रान्सपरन्सी इन अकौटिंग प्रॅक्टिस –** बँकांनी हिशोब करताना ते पूर्णपणे पारदर्शी पद्धतीचे असतील याची काळजी घेतली पाहिजे. अकाउंटिंग स्टँडर्ड आणि अकाउंटिंगचे नियम काटेकोरपणे पाळले गेले पाहिजेत.

कर्ज खाती सदाहरित करण्याचे कृत्रिम प्रयत्न हे नियमबाह्य आहेत. या प्रकारच्या प्रथा बँकेत अजिबात नसाव्यात.

**५) लिक्विडिटी मॅनेजमेंट –** बँकिंग व्यवसायामध्ये तरलता राखणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. यासाठी ए. एल. एम. कमिटी ही सक्षम असावी आणि ठेवी आणि कर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा दुरावा होणार नाही याची काळजी घेतली जावी. ठेवीदारांनी कोणत्याही क्षणी त्यांच्या ठेवींची मागणी केल्यास त्या ठेवी परत करण्याइतकी तरलता बँकेत कायम असणे आवश्यक आहे, त्यासाठी योग्य ती तरतूद केलेली असावी.

**६) क्वालिटी अँड साईज ऑफ ह्यूमन रिसोअर्सेस –** बँकिंग व्यवसाय हा जाणकारांनी करावयाचा व्यवसाय आहे. त्यासाठी आवश्यक असलेले योग्य मनुष्यबळ, योग्य प्रमाणात बँकेमध्ये असावे. ज्या क्षेत्रात विशेष प्रकारच्या अभ्यासाची आवश्यकता आहे. उदाहरणार्थ कर्ज व्यवहार, गुंतवणूक, वसुली, या क्षेत्रात त्या त्या विषयातील जाणकार आणि अनुभवी व्यक्ती नियुक्त केलेल्या असाव्यात. योग्य मनुष्यबळ ही बँकेची संपत्ती असते.

**७) क्वालिटी ऑफ आय टी सिस्टिम –** बँकेत वापरली जाणारी संगणक प्रणाली अद्ययावत असावी, सुरक्षित असावी आणि वापरासाठी सुलभ असावी. संगणक प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती काळजी घेतली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत संगणक प्रणालीमध्ये अनधिकृत हस्तक्षेप होणार नाही अशी व्यवस्था असावी. ही सुरक्षा वेळोवेळी तपासून पाहिली जावी.

**८) नॅव्हिगेटिंग द चेंज –** कोणत्याही व्यवसायात बदल हा अपरिहार्य असतो. बँकिंग व्यवसाय त्याला अपवाद नाही. बँकिंगमध्ये सातत्याने वेगळ्या प्रकारचे बदल होत असतात, या बदलाला सामोरे जाण्यासाठी तयारी असली पाहिजे. बँकिंग व्यवसायाला असणारी अन्य क्षेत्रांकडून स्पर्धा याचे कायम भान राखले पाहिजे. समाज माध्यमातून व्यक्त होणारी मते आणि मतांतरे याचा बँकिंगवर, बँकिंग व्यवसायावर अपरिहार्यपणे परिणाम होत असतो. विशेषतः नकारात्मक बातम्यांचा बँकिंग वर प्रतिकूल परिणाम होत असतो असा अनुभव आहे. याबाबतीत बँकांनी सावधपणाची भूमिका ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

वरील आठ मुद्द्यांबाबत नागरी सहकारी बँकांनी अत्यंत गांभीर्याने विचार केला पाहिजे आणि यात सातत्यही राखले पाहिजे.

**(SAF = Supervisory Action Framework)**

**– डॉ. अभय मंडलिक (लेखक देवगिरी बँकेचे माजी सीईओ असून, खामगाव अर्बन बँकेचे संचालक आहेत, बँकिंग या विषयाचे अभ्यासक आहेत.**

# सहकारी पतसंस्थांनी दैनंदिन व्यवहारात पाळायची तत्त्वे

पतसंस्थांना, सुरक्षित कर्जाचा सर्वोत्तम पर्याय म्हणजे सोनं तारण! गेले काही वर्षांत सोने तारण कर्ज हा सहज व त्वरित उपलब्ध होणारा चांगला पर्याय सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध झाला आहे. फायनान्स कंपन्या, खाजगी व इतर बँकांबरोबरच नॅशनलाईज बँकांनी हे ओळखून आपल्या कर्जातील मोठा पोर्टफोलीओ सोने तारण कर्ज देवून सुरक्षीत केला आहे व करत आहेत.



वासुदेव काळे
९८२२८ ३७०२५

**⁕ व्यवसायानुसार लवचिकता –** सहकारी पतसंस्था खूप मागे तर आहेच, पण सर्वात सुरक्षित कर्ज पर्याय असूनही त्याच्याकडे दुर्लक्षच झाले आहे. काळानुसार बदलून, व्यवहारात व व्यवसायात लवचिकता आणण्यात पतसंस्था कमी पडतात असे वाटते. खरंतर सोनेतारण कर्ज घेणारा ग्राहक हा पतसंस्थांचाच असूनही तो दूर जात आहे. ग्राहकांशी व्यक्तिगत संपर्क, ओळख व परिचय या पतसंस्थेच्या जमेच्या बाजू असूनही ग्राहक सांभाळण्यात कुठेतरी चूक होते असे वाटते. व्हॅल्युएशन काढताना, व्याजदर ठरवताना, कर्ज कालावधी ठरवताना पतसंस्था लवचिकता ठेवण्यात कमी पडतात. ग्रामीण भागाची अर्थवाहिनी असलेली पतसंस्था चळवळ बदल स्वीकारताना पुढे नसतात. प्रत्येक गावात मुथ्थुट फायनान्ससारख्या कंपन्या, बँका आता तर ऑनलाईन कर्जमंजुरीसारखे पर्याय आले आहेत. ग्राहक अक्षरशः हे लोक पळवतात नव्हे आपण त्यांना तो मार्ग दाखवतो असे वाटते.

**⁕ जाहीरात –** मोठे आर्थिक पाठबळ, कॉरपोरेट लेव्हलचे मार्केटिंग, अत्यंत ट्रेन्ड स्टाफ, जाहिरातीची मोठी यंत्रणा व सोनेतारण व्यवसायाच्या जाहिरातीचे मोठे आर्थिक बजेट यामुळे ग्राहक आकर्षित करण्यात ते यशस्वी होत आहेत, पण आपले काय? जाहिरातीवर पतसंस्थांनी खर्चाचे बजेट तयार करायला हवे. या क्षेत्रातील तज्ञ मंडळींना सोबत घेऊन ग्राहकांपर्यंत पोहचायला हवे.

**⁕ स्पर्धात्मक व्याजदर व मूल्यांकनाबाबतची लवचिकता –** सोनेतारण कर्ज वितरणात पतसंस्थांना आपला पोर्टफोलिओ वाढवायचा असेल तर मार्केटिंगसोबत वस्तूंचे मूल्यांकन करणारी तत्पर यंत्रणा, अभ्यासपूर्वक ठरवलेले व्याजदर, ग्राहकांना तत्पर सेवा याकडे लक्ष द्यावे लागेल. आपण व्याजदर कमी करण्यावर भर देतोय तर ते १८%+ व्याजदर घेत आहेत.

**⁕ प्रशिक्षित कर्मचारी –** सोनतारण वाढवण्यासाठी पतसंस्थेतील कर्मचारी उत्साही, हसतमुख असण्याबरोबरच त्याला याबाबतचे प्रशिक्षणही असायला हवे. व्याजदरातील लवचिकता, कर्ज मुदत अन् महत्त्वाचे त्याला असणारी पैशाची गरज ओळखूनच कर्ज, तेही नियमात देण्यावर भर देणारा असावा. वारंवार याबाबत होणारे प्रशिक्षण यात सहभाग घेण्यास त्याला प्रवृत्त करायला हवे.

**⁕ संचालक मंडळाची मानसिकता –** पतसंस्थेतील बहुतांशी संचालक मंडळाची मानसिकता आजही व्यवसायिकता, आधुनिकता, टेक्नॉलॉजी स्वीकारण्याची नाही. नफा मिळवणे हा आपला उद्देशच नाही ही धारणा आजही आहे. ती बदलावी लागेल, पूर्वीची व्यवस्था, कर्जदाराची मानसिकता, संचालक मंडळाचा कर्ज देतानाचा उद्देश आता बदलायला हवेत. सुरक्षीत, उत्पादक, सहजता व हस्तांतरक्षम कर्जे याचा विचार करता सोनेतारण कर्जवितरण जगात प्रथम क्रमांकात मोडते. याचा विचार पतसंस्थांमधील संचालकांनी करायला हवा.

**⁕ सोनेतारण व धोका –** सोनेतारण हे जगात सर्वात सुरक्षित व उत्पादनक्षम कर्ज मानले जात असले तरी व्यवस्थेत जगाच्या तुलनेने धोकेही जास्त आहेत, त्याचाही विचार करावा लागेल.

विश्वासार्ह गोल्ड व्हॅल्युअर सर्वात महत्त्वाचा घटक आहे. सोबतच त्याचे त्या क्षेत्रातील ज्ञान व अनुभवही आधुनिक तंत्रज्ञानामुळे हुबेहूब वस्तू, कोटिंग केलेल्या वस्तू, खोटे सोने ओळखणे महत्त्वाचे आहे. स्टाफही याबाबतीत तज्ञ होणे गरजेचे आहे. आधुनिक यंत्रणा आता उपलब्ध आहेत. किंमत जास्त असल्या तरी तो सोने चेकिंगला चांगला पर्याय आहे. मूल्यांकनाबाबत दक्षता घेणारा गोल्ड व्हॅल्युअर असायला हवा.

**– वासुदेव काळे, मो. नं. – ९८२२८३७०२५**
**कुटुंबप्रमुख – श्री सिद्धीविनायक पतसंस्था परिवार, श्रीरामपूर.**

# उद्यमी महिला पतसंस्थेच्या वतीने कर्जदारांचा सत्कार

जळगाव – उद्यमी महिला पतसंस्थेची कर्जाची परतफेड वेळेवर करणाऱ्या कर्जदारांचा सत्कार एका समारंभात करण्यात आला. यावेळी महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माजी उपमहापौर कुलभूषण पाटील, सामाजिक कार्यकर्ते अतुल बारी, सुरेश सोनवणे, माजी नगरसेविका शोभा बारी, पतसंस्था अध्यक्ष पद्मजा अत्रे, उपाध्यक्ष मनीषा खडके, व्यवस्थापकीय संचालिका प्रीती गुजराथी उपस्थित होते. अक्षरा देशपांडे यांनी सूत्रसंचालन आणि मनीषा खडके यांनी प्रास्ताविक केले. माधवराव गोळवलकर रक्त केंद्राच्या वतीने शिबिर आयोजित करण्यात आले होते.


माणसांच्या मनांना विणणारी बँक
कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.,
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक

शुभाशीर्वाद — आमची प्रेरणा — चेअरमन


आदरणीय कल्लाप्पाण्णा आवाडे (दादा)
माजी खासदार व उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य


आमदार प्रकाशआण्णा आवाडे
माजी वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य


श्री. स्वप्निलदादा आवाडे

बँकेच्या विविध कर्ज योजना
- सावली गृह कर्ज योजना
- ॲग्री सावली कर्ज योजना
- शेती कर्ज योजना
- पुष्पक वाहन कर्ज योजना
- ज्ञानसाधना शैक्षणिक कर्ज योजना
- गृहसजावट कर्ज योजना
- डॉ.,सीए, इंजि. व्यावसाईक कर्ज योजना
- प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कर्ज योजना
- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कर्ज योजना
- आण्णासाहेब पाटील महामंडळ कर्ज योजना
- स्थावर व मशिनरी तारणी कर्ज योजना
- सोने तारण कर्ज योजना

ठेवीवर आकर्षक व्याजदराच्या विविध योजना
महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात ४४ शाखांसह कार्यरत

# सहकारातूनच प्रत्येक व्यक्तीचा विकास शक्य

## सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटनमंत्री पाचपोर यांचे प्रतिपादन




**धाराशीव –** समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रत्येक व्यक्तीचा विकास होण्यासाठी सहकाराची आवश्यकता आहे. 'विना सहकार नाही उद्धार' हे प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येकाने सहकारातून समृद्धीकडे जाण्यासाठी सहकार भारती सोबत जोडून काम करण्याची गरज आहे असे सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांनी सांगितले.

सहकार भारती आणि इफ्को कंपनीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत संचालक म्हणून निवडून आल्याबद्दल वर्षा कस्तुरकर यांच्या सत्कार समारंभात बोलत होते.

उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष वसंतराव नागदे, अखिल भारतीय सेवा भारतीच्या सचिव श्रीमती चंद्रिका चव्हाण सहकार भारतीचे धाराशिवचे अध्यक्ष संतोष तौर उपाध्यक्ष उद्धव गपाट, जिल्हा मंत्री डॉ. हर्षल डंबळ आदी उपस्थित होते.

सहकार चळवळीची सुरुवात महाराष्ट्रात झाली त्या सहकार चळवळीला गती देण्याची गरज आहे असे नमूद करून ते म्हणाले, सर्व क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन करून आर्थिक परिवर्तनाची ताकद सर्वसामान्यांच्या हातात यावी यासाठी सहकार भारती कार्य करत आहे. 'विना संस्कार नाही सहकार' हे ब्रीद डोळ्यासमोर ठेवून सहकार क्षेत्रातल्या संस्थांचे जाळे उभारण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी पुढे यावे देशातल्या सर्वात मोठ्या सहकारी संस्था असलेल्या 'इफको' आणि 'अमूल' या संस्थांमध्ये सरकारी भाग भांडवल नाही. केवळ सर्वसामान्यांच्या शेअर्स गुंतवणुकीमुळे यामध्ये सरकारी हस्तक्षेप कमी होऊन प्रत्येक सभासदाला प्रतिष्ठा मिळाली आहे, सेवा पुरवठादार तसेच शेती आणि शेती प्रक्रिया क्षेत्रात अन्नप्रक्रिया, उद्योग वाहतूक यासह विज्ञान तंत्रज्ञान आणि सर्व क्षेत्रात सहकारी संस्थांच्या उभारणीला मोठा वाव आहे. सहकार भारतीने पतसंस्था, सहकारी बँकात काम करणाऱ्या प्रत्येक घटकाला प्रशिक्षित करून कामात गतिमानता येण्यासह प्रयत्न करीत आहेत.

डॉ. कस्तुरकर यांनी इफ्को संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी बी बियाणे खते यासह इतर उत्पादनांसोबत शेतीसाठी ड्रोनदीदी सारख्या केंद्र सरकारच्या नवनवीन योजना संकल्पनांमधून महिला शेतकऱ्यांनाही प्रशिक्षित करण्यासह शेती व्यवसायाभिमुख विविध प्रशिक्षण कौशल्य यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून जबाबदारीला न्याय द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

सहकार क्षेत्रात प्रामाणिकपणा, चारित्र्य यासह पारदर्शकता ठेवल्यास लोकांच्या विश्वासाला पात्र ठरून उत्तम काम करता येते, त्यामुळे सहकार क्षेत्रातील काम करणाऱ्या सर्व घटकांनी याकडे कटाक्षाने लक्ष देण्याची गरज अध्यक्ष नागदे यांनी व्यक्त केली. सहकार भारतीमुळे देशपातळीवरील मोठ्या सहकारी संस्थेची संचालिका म्हणून काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल डॉ. कस्तुरकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली. आगामी काळात धाराशीव जिल्ह्यासह महाराष्ट्रात आणि देशात शेतकऱ्यांसाठी इफकोच्या सर्व योजना बी बियाणे खते यासह ड्रोन दिदी या महिला शेतकऱ्यांसाठीच्या योजनांवर भर देणार असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक संतोष तौर यांनी केले. सहकार भारतीच्या धाराशिव जिल्ह्यातल्या कार्याची सुरुवात असून आगामी काळात सर्व घटकांसाठी काम करण्याचे सुतोवाच केले. तर डॉक्टर हर्षल डंबळ यांनी सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील सहकारी संस्थांनी सहकार भारती सोबत येऊन काम करण्याचे आवाहन केले. आभार डॉ. हर्षल डंबळ यांनी मानले. प्रारंभी भारत माता आणि स्व. लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले अभिलाष लोमटे यांनी सूत्रसंचालन केले.

---

# नागपूर नागरिक सहकारी बँकेने केला ३००० कोटींपेक्षा अधिक व्यवसाय

**नागपूर –** येथील नागपूर नागरिक सहकारी बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ३००० कोटींपेक्षा अधिक व्यवसायाचा टप्पा गाठला आहे. तर एनपीएचे प्रमाण शून्य टक्के ठेवण्यात यश मिळविले आहे. बँकेच्या वार्षिक सर्व साधारण सभेत बँक अध्यक्ष संजय भेंडे यांनी ही माहिती सांगितली.

गेल्या आर्थिक वर्षातील बँकेच्या प्रगतीचा आढावा अध्यक्ष भेंडे यांनी घेतला. ते म्हणाले बँकेचा सीआरएआर १४.१० टक्के आणि कर पूर्व नफा १५.९० कोटी इतका झाला आहे. बँक भाग भांडवल ३१.४२ कोटी असून त्यात यंदा ३.०८ कोटीची वाढ झाली आहे.




बँकेचा प्रती कर्मचारी व्यवसाय ७.९३ कोटी असून कर्ज वसुली ३.१६ कोटी झाली आहे. ठेवी १८४० कोटी आणि कर वितरण १२०७ कोटी करण्यात आले आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली. यावेळी बँक पदाधिकारी, संचालक, अधिकारी, ग्राहक उपस्थित होते.

# देवगिरी बँकेला 'इनोव्हेटिव्ह बँक ऑफ द इयर' पुरस्कार प्रदान



**छत्रपती संभाजी नगर –** देवगिरी बँकेला इनोव्हेटिव्ह बँक ऑफ द इयर हा प्रतिष्ठित पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, संचालक राजेश जैन नागनाथ काजळे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण नांदेडकर उपस्थित होते.

व्यवसायवाढीसाठी बँकेने कायमच नवनवीन कल्पना जसे की पक्ष्यांच्यासाठी पाण्याची भांडी वाटप, जलसंवर्धन, बारव स्वच्छता अभियान, बोअरवेल पुनर्भरण अभियान, फिटनेस क्लब, योग, कर्ज मेळावे, अद्ययावत कॉल सेंटर, सोशल मीडियाचा प्रभावी वापर राबवल्या अशा विविध उपक्रमांतून सामाजिक कार्य करीत बँकेची इमेज ब्रँडिंग झाले. त्यामुळे मोठा ग्राहक वर्ग मिळून व्यवसाय वाढला. आपले नाव इनोव्हेटिव्ह सहकारी बँक पुरस्कारावर कोरले.

बँकेच्या उत्तम कामगिरीसाठी अध्यक्ष किशोर शितोळे यांनी सर्व सभासद, ग्राहक व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे. देवगिरी बँकेच्या यशाचे आणखी एक उदाहरण म्हणजे दोन नवीन शाखांसह एकूण ३३ शाखा ग्राहकांच्या सेवेत सज्ज आहेत. नवीन शाखांमुळे ग्राहकांना अधिक सोयीस्कर आणि व्यापक सेवा देण्यासाठी बँक कटिबद्ध आहे.

बँकेचे अध्यक्ष शितोळे यांना नुकताच भारतरत्न राष्ट्रीय सहकारिता सन्मान कार्यक्रमात बेस्ट चेअरमन पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पार्श्वभूमीवर हा पुरस्कार बँकेच्या प्रगतीचे द्योतकच आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेने मागील आर्थिक वर्षात ५० कोटींचा विक्रमी नफा मिळवला आहे. पुरस्कार सोहळ्यास, उप मुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे, अनिल सुतवने, अविनाश मोरे उपस्थित होते.

# यवतमाळ अर्बन बँक अध्यक्षपदी डॉ. नितिन खर्चे यांची बिनविरोध निवड



**यवतमाळ –** यवतमाळ अर्बन बँक अध्यक्षपदी डॉ. नितिन खर्चे यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तत्कालीन अध्यक्ष अजय मुंधडा यांनी राजीनामा दिल्याने नव्याने निवडणूक घेण्यात आली. उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. डॉ. खर्चे हे गेली ८ वर्षे संचालक म्हणून कार्यरत आहेत. तसेच गेल्या दोन वर्षांपासून त्यांनी बँकेच्या उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळली आहे.

जिल्हा सहकार भारतीचे पदाधिकारी संजीव जोशी (उपाध्यक्ष), राकेश मिश्रा कोषाध्यक्ष, रामजी साकळे (महामंत्री), वीणाताई देशपांडे (महिला प्रमुख), अजय दंडे मुख्य कार्य. अधिकारी, जनता नागरी सह. पतसंस्था भूषण मुळे मुख्य कार्य. अधिकारी, जयंत भिसे नागरी सह. पतसंस्था, सहकार सुगंध विदर्भ रिजनल हेड संतोष गावंडे तसेच सहकार भारतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सहकार सुगंध मासिकाचा अंक यावेळी डॉ. खर्चे यांना देण्यात आला.

डॉ. खर्चे सहकार भारती शेला व पुष्पगुच्छ आणि सहकार सुगंध अंक देऊन सर्वांनी अभिनंदन केले.

# पतसंस्थेतील १ लाखापर्यंतच्या ठेवींना संरक्षण



पुणे – सहकारी पतसंस्थेतील एक लाख रूपयांपर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्यात येणार आहे, अशी माहिती सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सांगितली. राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळाला पतसंस्थांच्या स्थिरीकरण आणि तरलतेसाठी १०० कोटीचा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

ते म्हणाले, समाजातील गोरगरीब जनता पतसंस्थेत गुंतवणूक करीत असते चुकून एखाद्या पतसंस्थेत आर्थिक अडचण निर्माण झाली तर गुंतवणूक केलेला निधी परत मिळण्यासाठी त्रास सहन करावा लागतो. अनेकदा पैसे बुडण्याची देखील भीती असते. याचा विचार करून पतसंस्थेतील ठेवींना संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी सरकारच्या वतीने शंभर रुपयांच्या मागे दहा पैसे शुल्क आकारणार आहे. यामुळे सदस्यांचा पतसंस्थेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्यास मदत होणार आहे, असे ते म्हणाले.

# सहकार आणि कृषीवाढीसाठी सहकारी संस्थांनी पुढाकार घ्यावा

**यवतमाळ –** देशातील विविध राज्यातील सहकार आणि कृषि व्यवसाय वाढीसाठी पीक वैविध्य तांत्रिक उपाययोजना आणि त्याचा अवलंब, साधनसामुग्री व्यवस्थापन यासाठी सहकारी संस्थांनी पुढे यावे असे आवाहन उपजिल्हाधिकारी सुहास गाडे यांनी येथे केले आहे. इफ्को कृषि विज्ञान केंद्र संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.

यामध्ये सहकारी पणन संस्था सदस्य, शेतकरी, उत्पडक संघटना, विक्रेते, कृषि व्यवसाय क्षेत्रातील भागधारक सहभागी झाले होते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुरेश नेमाडे यांनी खरीप पिकांसाठी पोषक द्रव्ये आणि व्यवस्थापन आणि ड्रोन तंत्रज्ञान याबाबत सविस्तर विवेचन केले.

# रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला 'रिस्क मॅनेजमेंट'साठी आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान



**मुंबई–** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला, युनायटेड किंगडमच्या सेंट्रल बँकिंगने प्रदान केलेला, 'रिस्क मॅनेजर ऑफ द इयर २०२४' हा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. देशाच्या आर्थिक आणि बँकिंग स्थिरतेसाठी विविध आर्थिक जोखमींचे निरीक्षण आणि नियंत्रण हे आरबीआयच्या महत्त्वपूर्ण कार्यांपैकी एक आहे. बँकेचे कार्यकारी संचालक मनोरंजन मिश्रा यांनी हा पुरस्कार स्वीकारला आहे.

बँकिंग आणि एकूणच आर्थिक क्षेत्रात सद्य कालावधीत जोखीम व्यवस्थापन (Risk Management) हा महत्त्वाचा विषय बनला आहे. जोखीम व्यवस्थापनासाठी आंतरराष्ट्रीय मानके आहेत. ही मानके विविध जोखमींचे कार्यक्षम मूल्यांकन, व्यवस्थापन आणि जोखीम कमी करण्यासाठी नियम, मार्गदर्शक तत्त्वे आणि कार्यप्रणाली आखण्यास मदत करतात.

रिझर्व्ह बँकेने जोखीम व्यवस्थापनासाठी काही भारतीय मानके विकसित केली आहेत. मुख्यत्वे कृषी अर्थव्यवस्था असल्याने, भारतीय अर्थव्यवस्थेवर हवामान बदल आणि पावसाचा परिणाम मोठया प्रमाणावर होतो. म्हणून आरबीआयने अलिकडेच हवामान बदल जोखीम व्यवस्थापन मॉड्यूल विकसित केले आहे. सर्व बँकांना हवामान बदलाच्या जोखमीच्या मूल्यांकनासाठी समिती स्थापन करण्यास सांगितले आहे. जोखीम व्यवस्थापनासाठी सध्या प्रत्येक बँकांत समित्या आणि कार्यप्रणाली आहेतच. चलन, चलनवाढ, महागाई, पैशांचा पुरवठा, देशाची आर्थिक स्थिरता, बँकिंग क्षेत्राची स्थिरता, जीडीपी वाढ आणि अशा अनेक जोखमींचे व्यवस्थापन आरबीआय करते. जोखीम व्यवस्थापन कार्यप्रणाली तयार करण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आरबीआयचा जोखीम देखरेख विभाग कार्यरत असतो.

# अडचणीत असणाऱ्या शेतकऱ्यांना जळगाव जनता सहकारी बँकेचा मदतीचा हात

**जळगाव –** अडचणीत असणाऱ्या शेतकऱ्यांना सामाजिक बांधीलकीच्या जाणिवेतून जळगाव जनता सहकारी बँकेने मदतीचा हात दिला आहे. शेतीपूरक व्यवसायाला चालना देण्यासाठी दुग्ध संपदा कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे. त्याचा प्रारंभ नुकताच करण्यात आला आहे. या अंतर्गत एकूण ३८ शेतकऱ्यांना साडेतीन कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केशवस्मृती सेवा संस्था समूहाचे प्रमुख डॉ. भरत अमळकर होते. बँक अध्यक्ष सतीश मदाने, संचालक, अधिकारी तसेच जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. शशिकांत पाटील, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक प्रशांत पाटील आदी यावेळी उपस्थित होते. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय नागमोती यांनी प्रास्ताविकात योजनेची माहिती सांगितली. हरिश्चंद्र यादव यांनी आभार मानले. निलम जोशी यांनी सूत्र संचालन केले.




# एनकेजीएसबी सहकारी बँकेच्या व्यवसायात लक्षणीय वाढ

**मुंबई –** एनकेजीएसबी सहकारी बँकेच्या गेल्या दोन वर्षांपासून व्यवसायात सातत्याने वाढ झाली आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात सन २०२३-२४ मध्ये बँकेने मिश्र व्यवसायाचा रुपये १३,०००/- कोटींचा टप्पा ओलांडला आहे. बँकेचे निव्वळ अनुत्पादित कर्जे २.२७% पर्यंत कमी झाले आहेत. बँकेचे भांडवली पर्याप्तता गुणोत्तर (CRAR) १२.८५% पर्यंत वाढला आहे. बँकेच्या अध्यक्षा सीए हिमांगी नाडकर्णी यांनी सांगितले की, बँक प्रगती, निरंतर वाढ आणि टिकाऊपणाच्या मार्गावर आहे. ग्राहकांची पसंतीची बँक बनणे हे बँकेचे उद्दिष्ट असणार आहे.

## श्री सिद्धनाथ सहकारी पतसंस्थेच्या स्वीकृत संचालकपदी सोनिया गोरे

**दहिवडी, जिल्हा सातारा –** येथील श्री सिद्धनाथ सहकारी पतसंस्थेच्या स्वीकृत संचालकपदी सोनिया गोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत १३ संचालक निवडणूक आले आहेत. त्यानंतर दोन संचालक स्वीकृत करण्यात आले आहेत. त्यामध्ये संजय गांधी आणि सोनिया गोरे यांचा समावेश करण्यात आला आहे.

संस्थेच्या नूतन संचालकांची सभा नुकतीच झाली. त्यात वरील सदस्यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेचे संचालक आणि अधिकारी यांनी नूतन संचालकांचे अभिनंदन केले आहे.

# प्रशिक्षण, संशोधन आणि विस्तार उपक्रमांसाठी
# व्हॅमिनीकॉम आणि एमसीडीसीत सामंजस्य करार



**पुणे –** वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था आणि महाराष्ट्र सहकारी विकास महामंडळ यांच्यामध्ये सामाजिक, आर्थिक विकासासाठी प्रशिक्षण, संशोधन आणि विस्तार अशा विविध उपक्रमांसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संचालक मिलिंद आकरे आणि संस्थेच्या संचालक डॉ. हेमा यादव यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. संस्थेचे प्रा. यशवंत पाटील, आर. के. मेनन, सल्लागार डी. रवी आणि महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते. डॉ. यादव यांनी सांगितले की, महामंडळामार्फत व्यवसायिक उपक्रमावर लक्ष केंद्रित करून विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांच्या सुधारणांसाठी व्यावसायिक उपक्रम विकसित करण्यासाठी हा प्रकल्प असणार आहे. तर संचालक आकरे यांनी सांगितले की, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने नाबार्ड, एनसीडीसी, कृषि विभाग, प्रधानमंत्री सूक्ष्म अॅन प्रक्रिया योजना आदि संस्थांनी चांगले काम केले आहे. या कराराचा नजीकच्या काळात एक कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे, असे ते म्हणाले.

## जनता सहकारी बँकेला ४९.०९ कोटींचा नफा

**पुणे –** येथील जनता सहकारी बँकेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ४९.०९ कोटी रूपयांचा नफा झाला असून अनुत्पादक मालमत्ता कमी करण्यात बँकेला यश मिळाले आहे. बँकेची ७५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली, यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली.

एकूण व्यवसायाचा बँकेने १५ हजार कोटीचा टप्पा पार केला असून कर्ज वसुलीचे प्रमाण समाधानकारक आहे. आजवर १३६.८३ कोटी रुपयांची कर्ज वसूली करण्यात आली आहे. तसेच अटल पेन्शन योजनेच्या माध्यमातून बँकेने जास्तीत जास्त खाती उघडली आहेत. आजवर बँकेत विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. यावर्षीच्या नफ्यातदेखील चांगली वाढ झाली आहे. सभेला मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी महाराज पतसंस्थेचा सदस्यांना ६% लाभांश जाहीर

**कोरेगाव, जिल्हा सातारा –** येथील छत्रपती संभाजी महाराज पतसंस्थेस नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ६ कोटी ६३ लाख रूपयांचा नफा झाला आहे. या संस्थेच्या पश्चिम महाराष्ट्रात ५३ शाखा कार्यरत आहेत. संस्थेने सदस्यांना ६ टक्के लाभांश जाहीर केला आहे. संस्थेचे संस्थापक रामभाऊ लेंभे यांनी ही माहिती सांगितली.

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली. अध्यक्ष स्थानी संस्था अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण होते. संस्थेच्या गतवर्षीच्या एकूण व्यवसायात १६८ कोटी ८७ लाख रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे एकूण व्यवसाय ११६५ कोटी ४ लाख इतका झाला आहे. ठेवींमधे वाढ होऊन ६६१ कोटी २९ लाख झाल्या आहेत. तसेच खेळते भांडवल ७४२ कोटी ७५ लाख झाले आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली. अध्यक्ष चव्हाण यांनी मनोगतात विविध योजनांची माहिती सांगितली. सभेला उपाध्यक्ष श्रीकांत शेटे आणि संचालक उपस्थित होते. विठ्ठल माने यांनी सूत्रसंचालन तर कार्यकारी संचालक भावेश ढमाळ यांनी आभार मानले.

## आर्थिक बळकटीसाठी सहकारी बँकांनी नवतंत्रज्ञानावर भर द्यावा

**पुणे –** बँकिंग क्षेत्रातील नवीन आव्हाने पेलण्यासाठी सर्वांनी तयार राहावे असे आवाहन राज्य सहकारी बँक्स असोसिएशन अध्यक्ष विश्वास ठाकुर यांनी केले आहे. असोसिएशनचे विभागीय शिबीर येथे पार पडले. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले सहकारी बँकांना अधिक बळकट होण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे.

राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे, जिल्हा सहकारी संस्था उपनिबंधक आनंद कटके, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन अध्यक्ष सुभाष मोहिते, पुणे पीपल्स सहकारी बँक अध्यक्ष जनार्दन रणदिवे उपस्थित होते. प्रशिक्षक गणेश निमकर, श्रुती सिधये, सुदीप डोंगरे, धवल कुलकर्णी, श्रीराम काणे, विकास नाईक उपस्थित होते. तसेच ३४ सहकारी बँकांचे पदाधिकारी अध्यक्ष, उपाध्यक्ष प्रशिक्षणासाठी उपस्थित होते.

## गृहनिर्माण संस्थांच्या विकासकामांसाठी सहकारी बँक कर्जपुरवठा करणार

**पुणे –** राज्यातील सहकारी गृह निर्माण संस्थांच्या विकसनासाठीच्या विकास कामांसाठी नागरी सहकारी बँकांनी कर्ज पुरवठा करण्यास आरबीआयने एका परिपत्रकाच्या माध्यमातून परवानगी दिली आहे. त्याबाबत सहकार आयुक्तांनी सूचना दिल्या आहेत. याचे स्वागत करण्यात येत असल्याचे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते यांनी सांगितले. ते म्हणाले, या परिपत्रकातील काही बाबींमध्ये अधिक स्पष्टता येण्याची गरज आहे. सोसायटीला सदस्य करून घेण्याबाबत यामध्ये कोणताही उल्लेख करण्यात आला नाही.

सहकारी बँकांनी सहकारी गृहनिर्माण संस्थेस कर्ज वाटपाने दिलेला पैसा हा सहकार क्षेत्रातच राहणार आहे, अशा स्वरूपाची मागणी यापूर्वी करण्यात आली आहे. यातील तरतुदींनुसार सहकार आयुक्तालयाच्या वतीने एक समिती तयार करण्यात आली होती.

# शिक्षण क्षेत्राला सहकारी बँकांनी आर्थिक पाठबळ द्यावे



वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

जून ते सप्टेंबर सर्वत्र शिक्षणाच्या नव्या वर्षाची सुरवात होते. शिक्षण महाग होत चालले आहे. त्यात प्रचंड प्रमाणात नाविन्य आल्याने अनेकविध शेखाविस्तार सर्वत्र सर्व क्षेत्रात होत आहे. त्यांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी तमाम सर्व सहकारी बँकांनी पुढे यावे. आपल्याच ग्राहकांच्या पुढच्या पिढ्यांना सक्षम बनविण्यासाठी शैक्षणिक कर्ज योजनेचा फायदा उचलावा आणि त्याचबरोबर बँकेची मालमत्ता–बँकेचे असेट्स वाढवावेत. नक्की मोठ्या प्रमाणात अशी कर्ज प्रकरणे करावीत.

देशात बदल होत आहेत, प्रगतीपथावरील आपला भारत नाविन्याचा स्वीकार करून स्थिरस्थावर होत आहे. काही तर जुनेच पण वेगळी झळाळी दिली जाते. त्यापैकी अतिशय महत्वपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात बदल तब्बल ३६ वर्षांनी म्हणजे १९८६ नंतर करण्यात आला. त्याचे स्वागत देशभर केले गेले. सर्वांना संधी, नि:पक्षपातीपणा, दर्जेदार, परवडणारे आणि उत्तरदायित्व देणारे अशा विचारांवर शैक्षणिक धोरणाची उभारणी करण्यात आली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण अधिक काळाचे, बहु शाखीय तसेच एकविसाव्या शतकाच्या तंत्रज्ञानाधिष्ट प्रगती मार्गाला अनुरूप केले आहे. देशाच्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी शिक्षणाची सांगड घातल्याने शिक्षीत तरुणाईचा दर्जा उंचवलेला राहील आणि तो काळानुरूप होईल अशी खात्री वाटते.

*** नवीन शैक्षणिक धोरण – NEP - National Education Policy** – केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण यावर्षी ६ जूनपासून देशभर लागू केलेले आहे. २०२४ च्या धोरणाचे उद्दिष्ट आहे सर्वांगीण शिक्षण, व्यवहाराभिमुख अभ्यासक्रम, नोकरी केंद्रीत कौशल्य विकास, तंत्रज्ञान, दर्जेदार शिक्षण होय. त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षणदेखील दिले जाणार आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागात सोशल मिडीयाचा अधिकाधिक वापर वाढवायचा प्रयत्न आहे. अभ्यासक्रम मराठी, हिंदी, इंग्रजी, तमिळ गुजराती भाषांमध्ये तयार करायचे ठरले आहे. बरेच अभ्यासक्रम मराठी भाषेत तयार होतील. त्याने मातृभाषेत अधिकाधिक शिक्षण देण्याची सोय होणार आहे. दहावीची बोर्ड परीक्षा रद्द करण्यात आल्याने मुलांना इतर काही शिकायला मोकळा वेळ मिळणार आहे. नव्या धोरणात तीन ते सहा वर्ष हा आत्तापर्यंत समाविष्ट न झालेला वयोगट घेतला गेला आहे. हेच वय जडणघडणीचे, संस्कार स्वीकृतीचे असते. त्याने त्यांच्या विकासाचा पाया इथेच सशक्त, सुसंस्कारित बनविला जाईल. या उद्देशाने सर्वसमावेशक शिक्षणावर भर देणारे धोरण आखलेले आहे.

**नवीन धोरण पुढीलप्रमाणे आहे. ५–३–३–४– वर्षे असा आहे.**

**१) पहिला टप्पा – ५ वर्ष – वय ४ ते ८ – अंगणवाडी ते दुसरी**

**२) प्राथमिक शिक्षण – ३ वर्ष – वय ९,१०,११ – तिसरी ते पाचवी**

**३) माध्यमिक शिक्षण – ३ वर्ष – वय १२,१३,१४ – सहावी ते आठवी**

**४) उच्च माध्यमिक शिक्षण– ४ वर्ष – वय १५,१६,१७,१८ नववी ते पदविका अभ्यास पूर्ण.**

केंद्र व राज्य सरकार निर्मित अनेकविध शिक्षण प्रकल्प नव्याने सुरु केले आहेत. ते असे.

अ) **अग्निपथ** – केंद्र सरकार – सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीने १४ जून, २०२२ रोजी 'अग्निपथ' नावे उत्तम सर्वांगीण शिक्षण योजना घोषित केली. भारतीय लष्कर, नौदल, वायुदल या तिन्ही सशस्त्र दलांच्या तीन सेवांमध्ये कमिशन्ड अधिकाऱ्यांच्या रँकपेक्षा काही अंशी कमी असलेल्या सैनिकांच्या भरतीसाठी मंजूर केलेली कर्तव्य शैली योजना आहे. यामधून सैनिक भरती केली जाणार आहे. येथील विद्यार्थी 'अग्निवीर' म्हणून संबोधिले जातील. सर्वांगीण सक्षम व्यक्तिमत्व घडवताना एकाच ठिकाणी वैविध्यपूर्ण शिक्षणाने एक उत्तम समाज निर्मिती करणारी महत्वाकांक्षी योजना होय. आकर्षक, परिवर्तनात्मक, शारीरिक मानसिक सक्षम, सुदृढ, तंत्रज्ञानाधिष्ट शिक्षण देणारी योजना लोकांच्या पसंतीस उतरली आहे. एकाच वेळी सैनिकी प्रशिक्षणाबरोबर उत्तम माणूस घडविला जाणार याला खूप मोल आहे. अग्निवीर नावाप्रमाणे स्वत:बरोबर जाज्वल्य समाज घडवतील, देशाला बळकटी देतील. असेच संस्कार आणि शिक्षण अग्निपथमध्ये दिले जाणार आहे. युद्धाच्या कठीण काळात मनुष्यबळ म्हणून यांचा सहभाग राहणार आहे.

अग्निपथ शिक्षण कालखंड चार वर्षाचा आहे. प्रवेशासाठी दहावी उत्तीर्ण आणि वय वर्षे १७.५ ते २३ वयाची अट आहे. मुले आणि मुली दोहोंचा सहभाग यामध्ये आहे. सैन्यदलाच्या तिन्ही सेवांमध्ये लागू असलेल्या भत्त्यांचे आकर्षक कस्टमाइज्ड मासिक पॅकेज आहे. याव्यतिरिक्त सेवानिधी पॅकेजमध्ये सरकारचे विशेष योगदान आहे. पहिल्या दोन वर्षाचे वर्ग सुरु झाले आहेत. येथील शिक्षणपुर्तीनंतर व्यक्तीमध्ये आमूलाग्र सकारात्मक बदल झालेला जाणवेल. बाहेर पडताना लाखो रुपये घेऊन घरी येतील, त्यातून व्यवसाय सुरु करणे सहज शक्य होईल.

वर्षातून दोनवेळा अग्निपथ कोर्ससाठी भारती होत आहे. पहिल्याच वेळी ४६००० जणांनी प्रवेश घेतला. अतिशय उत्तम योजनेला देखील काहीजण विरोधासाठी विरोध करीत आहेत. इच्छुकांनी माहिती घ्यावी आणि प्रवेश जरूर घ्यावा.

**आ) Non Banking Finance Company - NBFC -** काही नॉन बँकिंग फायनान्शियल कंपन्या शैक्षणिक कर्ज पुरवठा करतात. वैयक्तिकरित्या विद्यार्थ्यांना कर्जाऊ रक्कम शिक्षणासाठी दिली जाते. अनेक शैक्षणिक संस्थानादेखील वित्त पुरवठा देताना टर्म लोन दिले जाते.


**इ) बँकांकडून कर्ज घेणे –** अधिकांश लोकांच्या पसंतीस उतरलेली म्हणून स्वीकारलेली योजना आहे. सर्व प्रकरच्या बँका, राष्ट्रीयीकृत, खासगी, सहकारी, काही प्रमाणात पतसंस्था शैक्षणिक कर्ज देतात. सर्वसाधारणपणे योजना सारखी असली तरी प्रत्येक बँकेच्या योजनेत थोडाफार फरक असतो. तेव्हा कर्ज घेताना आपल्याला कुठल्या बँकेतून कर्ज घ्यायचे आहे, फायद्याचे अधिक काय, किती, कोणाकडे, व्याजदर, चार्जेस, परतफेड असा तौलनिक आढावा घेऊन बँक निवडावी.

**ई) प्रधानमंत्री विद्या लक्ष्मी कार्यक्रम – २०१५ –** भारत सरकार, मानव संसाधन विकास मंत्रालय, उच्चतर शिक्षा विभाग, भारतीय बँक संघ (IBA - Indian Bank's Association) आणि NSDL-e governance (www.egov-nsdll.co.in) सर्वांनी मिळून योजनेचे पोर्टल सुरु केले. www.vidyalakshami.co.in पोर्टलवर जाऊन विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने रकान्यात माहिती भरून कर्जअर्ज – CELF- Common Education Loan Application Form भरतो. तो अर्ज एनएसडीएल तर्फे डायरेक्ट बँकेकडे जाऊन विद्यार्थ्याला सोयीस्कर असलेल्या बँक शाखेकडे जातो. शाखेच्या CAPS - Credit Automation Processing System वर अर्ज आल्यावर बँक विद्यार्थ्याला बँकेत बोलावून घेते. सगळ्या गोष्टींची तपासणी व पुढील सर्वकाही नेहमीप्रमाणे होते. कर्ज मंजुरी, ते परतफेड असा एकूण प्रवास असतो.

शैक्षणिक कर्ज मुलगा आणि मुलगी दोघांसाठी सारखेच आहे. काही बँका मुलींना व्याजदरात ५०%//१% सूट देतात. दोघांना समसमान वागणूक देणे

**पुढील पानावर...**

महत्वाचे. यात पालकांचा सहभाग महत्वाचा आहे. कारण मुलींना कर्ज घेऊन शिकविणारा समाज आजही अल्पांशाने आहे. मुली उत्तम शिकू शकतात, पायावर उभ्या राहून कर्जफेड करतात, सासरी गेल्यावर देखील आपले गणित बरोबर सोडवतात आणि पुढे आईवडिलांना विचारतात देखील. तेव्हा केवळ मुलाला शिकवायचे आणि मुलींना पैसे नाहीत म्हणून घातलेले नाव काढायचे, घरी बसवायचे नाहीतर लग्न करून टाकायचे हे योग्य नाही.




मुलांनो आणि मुलींनो भरपूर शिका, यशस्वी व्हा, स्वत:ची बलस्थाने ओळखा, कमजोरी लक्षात असू दे, कष्टाची तयारी हवीच, वास्तवाचे भान पाहिजे. घरच्या परिस्थितीची जाण हवी. घराप्रती स्वत:ची जबाबदारी ओळखून वर्तन ठेवा. दांडग्या इच्छाशक्तीच्या जोरावर शिक्षण घेणार आहात आणि तेच तुमचे भविष्य उज्वल बनवणार आहे. आपल्या आईवडिलांनी तुमच्या आयुष्यासाठी खूप कष्ट घेतलेले असतात, शिक्षणासाठी स्वत:च्या साध्यासाध्या गरजादेखील त्यांनी पूर्ण केलेल्या नसतात. तेव्हा त्यांचा उपमर्द कधी करू नका. त्यांचा आदर करा समाजात मिसळा, जागरूक रहा, देशात काय स्थित्यंतरे होतात हे माहित हवे. शिक्षण संपले, नोकरी लागली, संसार थाटला आणि आईवडिलांची जबाबदारी टाळली हे अतिशय चुकीचे चित्र कोणी रेखाटू नये. गरज सरो वैद्य मरो, याप्रमाणे आईवडिलांना वागणूक देऊ नका. आईवडील तेही दोघांचे आहेत, अशा चौघांचीही काळजी दोघांनी आदराने प्रेमाने घ्यायची आहे. दोन कुटुंबांचे एकीकरण असल्याने अडीअडचणीला मदतीचा हात दिल्यावर आपल्या जोडीदाराला वाटणारा आनंद शब्दातीत असतो. तेव्हा जोडीदाराचे मन सांभाळून घेणे हीच सुखी संसाराची मेख आहे.

मुली कर्ज घेऊन सासरी जातात, तेव्हा सासरच्यांनी नवरोबांनी तिला त्रास देता कामा नये. ती माहेरचे सगळे सोडून लग्न करून सासरी येते, हे अवघड असते, ती ते करते. याची जाण सदोदित हवी. तेव्हा किती काय काय आणते, याचा विचार करा. स्वत:चा देह, मन, विचार, कपडेलत्ते, दागदागिने, अपेक्षा, आशा आकांक्षा, मित्रमैत्रीण, जिवलग सारे, आठवणी बरोबर आणते. तिच्या आपल्या लोकांना सोडून ती एकटी येते, किती धीराचे असते ते. इतक्या गोष्टी आणते तेव्हा कर्जाचे हप्ते तिने आणले तर काय बिघडले. मुलींनो, तुम्हीदेखील कर्जफेड आपल्या पगारातून करायची आहे. त्यासाठी आईवडिलांना कर्ज फेडायला लावू नका. मुख्य म्हणजे आपले पाय सासरी घट्ट रोवा. सासरच्यांनी तिचा आदर केला पाहिजे. तिला यासाठीच नव्हे तर कशाहीसाठी त्रास होता कामा नये ही जबाबदारी त्याची असते. इथे कर्जाबद्दल बोलताना मुलींनी ठाम भूमिका घेतली पाहिजे. तिला सपोर्ट त्याने दिला पाहिजे. सुशिक्षित व्हाल, तसेच सुसंस्कृत देखील व्हा. काही अडले तर विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा.

**– वंदना धर्माधिकारी मो.– ९८९०६२२९१५**

Vandana10dyahoo.co.in

*****

## उत्तराखंड प्रदेश अध्यक्षपदी विनोद गौड यांची निवड




**उत्तराखंड –** सहकार भारतीचे प्रदेशचे दोन दिवासीय अधिवेशन नुकतेच ऋषिकेश येथे पार पडले. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष दीनानाथ ठाकुर, राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पांचपोर, तसेच सहकार मंत्री धनसिंह रावत यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले आणि सहकार भारतीच्या विस्तार कार्यासाठी मोठ्या संख्येने कार्यरत राहण्याचे आवाहन केले.

या अधिवेशनात प्रदेश अध्यक्ष म्हणून विनोद कुमार गौड, अमित शांडिल्य यांची प्रदेश महामंत्री तर प्रदेश संघटन प्रमुख म्हणून राजेश वर्मा आणि प्रदेश महिला प्रमुख म्हणून श्रीमती गीता मौर्य यांची निवड करण्यात आली आहे.

## डॉ. अरुण निरंतर यांची स्वेच्छा निवृत्ती

**बीड –** येथील पूर्णवादी सहकारी बँकेच्या अध्यक्ष पदावरून डॉ. अरुण निरंतर यांनी निवृत्तीचा निर्णय जाहीर केला आहे. मात्र बँकेच्या संचालक पदावर ते कार्यरत राहणार आहेत. डॉ. निरंतर यांच्या अध्यक्षपदाच्या कालावधीत त्यांनी बँकेच्या नावलौकिकात भर घातली आणि अनेक महत्त्वाचे निर्णय त्यांनी घेतले. शाखा विस्तार, अद्ययावत डेटा सेंटर, भव्य वास्तु, मोबाइल बँकिंग आदी सुविधा त्यांनी ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. बँकेच्या ठेवी ८११.५५ कोटी, आणि कर्ज ५१५.६५ कोटी वितरित केले आहे. एकूण व्यवसाय १३२७.२० कोटी इतका झाला असून नेट एनपीए १.६२ टक्के आहे आणि बँकेला निव्वळ नफा ७.५८ कोटी इतका झाला आहे.

## मुख्य निवडणूक आयुक्त अनिल कवडे यांची विवेकानंद प्रत्यय संस्थेला सदिच्छा भेट

**नागपूर –** राज्याच्या सहकार निवडणूक प्राधिकरणाचे मुख्य आयुक्त अनिल कवडे यांनी नुकतीच येथील विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्थेला सदिच्छा भेट दिली आणि संस्थेच्या कामकाजाची माहिती घेतली. संस्थेचे अध्यक्ष विवेक जुगादे यांनी त्यांचे स्वागत केले. संस्था उपाध्यक्ष महेश अंधारे संचालक विवेक बापट, मधु गौर तसेच सहकार खात्याचे विभागीय सहनिबंधक प्रवीण वानखेडे, जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे आदी उपस्थित होते.

# दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

## THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL

॥ साहसे श्री : प्रतिवसति ॥

Regd.No.YML/BNK/114

मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 - **Phone :** 07232 - 244241, 243703, 237442

**E-mail :** ho_adm@yavatmalurbanbank.com - **Website :** www.yavatmalurbanbank.com

**ISO 9001:2015& ISO 27001:2013 CERTIFIED BANK**

## विदर्भ मराठवाड्यातील अग्रणी सहकारी बँक



**आम्ही जपतो वारसा विश्वासाचा**

**कर्जाचे अत्यंत माफक व्याज दर 8.25*% पासुन सुरू**

*नियम व अटी लागू

| **डॉ. नितीन खर्चे** अध्यक्ष | **श्री. राम गायकवाड** मुख्य कार्यकारी अधिकारी (प्र) |

**संचालक** - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर, श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर, श्री.अजिंदरसिंह मनोहरसिंह चावला, श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.प्रविण पांडुरंग खांदवे (तज्ञ संचालक), श्री.पियुष कैलासचंद्र खेतान (तज्ञ संचालक)

# गृहरचना संस्था

# शंका समाधान

## अपार्टमेंट कायदा - १९७०



**प्रश्न : अपार्टमेंट असोसिएशनमध्ये जमा होणाऱ्या रकमेची गुंतवणूक कशी व कोठे करावी? त्याबाबत काय नियम आहेत?**

**उत्तर :** प्रत्येक अपार्टमेंट संघाकडे जमा होणाऱ्या रकमेची गुंतवणूक कशी व कोठे करावी याबाबत महाराष्ट्र अपार्टमेंट कायदा १९७० मध्ये सविस्तर उल्लेख केलेला आहे. याबाबत बऱ्याच अपार्टमेंट संघामध्ये निधीची गुंतवणूक कशी व कोठे करावी याबाबत संभ्रम असतो. कारण सहकारी संस्थेची गुंतवणूक फक्त सहकारी बँकेत केल्यास त्यांना आयकरामध्ये सूट मिळते. तसेच भाग दाखल्याची रक्कम फक्त सहकारी बँकेतच ठेवण्याचे कायदेशीर बंधन आहे. तसे बंधन अपार्टमेंट कायद्यात नसल्याने भाग दाखल्याची रक्कम व अन्य निधी कोणत्याही बँकेत म्हणजे सहकारी व राष्ट्रीयीकृत बँकेत करता येते. कारण सहकारी संस्थांप्रमाणे अपार्टमेंट संघाच्या गुंतवणुकीवरील मिळणाऱ्या व्याजास आयकरातून कोणतीही सूट/सवलत मात्र मिळत नाही. म्हणून अपार्टमेंट संघाची आर्थिक गुंतवणूक व आर्थिक व्यवहार कोणत्याही बँकेतून करण्याची कायद्याने पूर्ण मुभा आहे हे पदाधिकाऱ्यांनी ध्यानात ठेवावे व त्याप्रमाणे निधीची गुंतवणूक करावी.



**ॲड. जयंत कुलकर्णी**
**९४२२० ०७५१०**

**⁕ उपविधी क्र. ४५ – निधी (फंड्स) –**

अपार्टमेंट संघाला खाली उल्लेखलेल्या एका अगर एकाहून अनेक मार्गांचा अवलंब करून (फंड) निधीची उभारणी करता येईल.

१) सभासदांकडून भागाची रक्कम घेऊन किमान एक भाग (शेअर) रु.१००/- किंवा रू.५००/- चा एक भाग किंवा घोषणापत्रातील संघाच्या उपविधीमधे दिल्याप्रमाणे. सभासद जेवढे असतील त्याप्रमाणात येणारी रक्कम.

२) अपार्टमेंट धारकाकडून मासिक शुल्काची निश्चिती करून त्याप्रमाणे रक्कम जमा करून घेणे किंवा अपार्टमेंट धारकाकडून ऐच्छिक देणगीच्या रूपाने संघाच्या निधीची उभारणी करता येईल.

३) अपार्टमेंट संघाच्या ताळेबंदानुसार झालेला नफा (प्रॉफिट) जो राखीव निधीमध्ये (रिझर्व्ह फंड) वर्ग करता येऊ शकतो असा निधी.

४) अपार्टमेंट संघास गरज भासल्यास कोणत्याही अधिकृत वित्तीय संस्थेकडून कर्जदेखील उभारता येते. परंतु त्यासाठी सक्षम अधिकाऱ्याची (आता सह / उप निबंधक सहकारी संस्था) पूर्व परवानगी आवश्यक.

**⁕ उपविधी नियम क्र.४६–निधीची गुंतवणूक अपार्टमेंट संघाला त्यांच्याकडील निधीची (फंड) गुंतवणूक खाली नमूद केलेल्या बँकांमध्ये करता येईल.**

१) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका किंवा राज्य सहकारी बँक (प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा बँक असते.)

२) भारतीय विश्वस्त कायदा १८८२ (इंडियन पब्लीक ट्रस्ट) च्या कलम २० नुसार उल्लेखिल्याप्रमाणे निधीची गुंतवणूक करता येते.

३) उपविधी नियम क्र.४६(१) मध्ये उल्लेखलेल्या बँकांव्यतिरिक्त राज्यातील कोणत्याही सहकारी बँकेमध्ये किंवा कोणत्याही राष्ट्रियीकृत बँकेमध्ये संघाच्या निधीची गुंतवणूक करता येऊ शकते.

**⁕ उप–विधी नियम क्र.४८ – हिशेबपत्रक (अकाऊंट्स)**

१) अपार्टमेंट संघाचा दैनंदिन आर्थिक व्यवहार चालवण्यासाठी जवळच्या कोणत्याही बँकेत संघाच्या नावाने खाते उघडून त्यामध्ये सभासदांकडून प्राप्त झालेली रक्कम जमा करावी तसेच त्यापैकी रू.१००/- पर्यंतची रोख रक्कम खर्चासाठी काढून सचिवाने किंवा खजिनदाराने गरजेनुसार खर्च करावा. तसेच रु.२० वरील सर्व खर्च संघाने चेकनेच करावा. चेकवर सचिव आणि व्यवस्थापन समितीमधील एका सदस्याची स्वाक्षरी घ्यावी व नंतरच चेक जमा करावा.

२) अपार्टमेंट संघाच्या सचिवाने प्रत्येक अपार्टमेंट धारकाच्या नावाने हिशोबाचे नोंदपुस्तक (पासबुक) तयार करून घ्यावे. त्यामध्ये अपार्टमेंटधारकाने संघास अदा केलेली रक्कम तसेच नफ्याची रक्कम जमा केलेली दर्शवावी, त्यानुसार अपार्टमेंट धारकाकडून येणे रक्कम प्रत्यक्ष देय रक्कम ठरवावी.

३) प्रत्येक अपार्टमेंट संघाने दरवर्षी ३१ जुलैपर्यंत किंवा तत्पूर्वी सामाईक सेवा-सुविधांच्या खर्चाचा ताळेबंद लेखापरीक्षकाकडून म्हणजे सी.ए. (चार्टर्ड अकाऊंटंट) तयार करून घ्यावा व सभासदांना सादर करावा त्यामध्ये (१) नफा-तोटा पत्रक (२) मागील आर्थिक वर्षाचा जमा खर्च. (३) संघाच्या मालमत्तेचा तपशील व संस्थेची देणी व येणी दर्शविणारी माहिती.

४) अपार्टमेंट संघाने तयार केलेला आर्थिक ताळेबंद सक्षम अधिकाऱ्यांना दरवर्षी १५ ऑगस्टपर्यंत सादर करून तो प्रत्येक अपार्टमेंटधारकाला पाहण्यासाठी कार्यालयात उपलब्ध करून ठेवावा व कार्यालयीन वेळेत येऊन प्रत्येक अपार्टमेंट धारकाने प्रत्यक्ष तपासावा असे लेखी कळवावे.

५) आर्थिक हिशेबपत्रकासोबत सर्व अपार्टमेंट धारकाच्या नावाची यादी (अपार्टमेंट डीडप्रमाणे) जोडणे आवश्यक असून आर्थिक हिशेबपत्रकात सामाईक सेवा-सुविधांचा जमा-खर्च कोणत्या तारखेपर्यंत घेतला आहे याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

**क्रमश:**

**ॲड. जयंत कुलकर्णी**
advjgk@yahoo.co.in



सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७ comm.urban@gmail.com

राज्यातील नागरी सहकारी बँकांनी
सहकारी गृहनिर्माण संस्थांना कर्जपुरवठा
करणेबाबत..

जा.क्र.ना.बँका/१सआ/सह.गृह.संस्था/कर्जपुरवठा/२०२४/1919 दिनांक २६/६/२०२४

## परिपत्रक

राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून संस्थेस विकसनासाठी विकास कामांसाठी / कर्ज मिळणेबाबत नागरी सहकारी बँकांकडे कर्ज मागणी करण्यात येते.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने राज्यातील गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या विकसनासाठी / विकास कामांसाठी कर्जपुरवठा करणेस परवानगी मिळावी, अशी मागणी राज्यातील नागरी सहकारी बँकांकडून होत आहे. नागरी सहकारी बँकांना, अन्य संस्थांना सभासद करून घेण्यास बँकींग विनियमन कायदा, 1949 अन्वये प्रतिबंध केलेला आहे. तथापि नागरी सहकारी बँकेने सहकारी गृहनिर्माण संस्थेस कर्जपुरवठा करणेसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेचे मास्टर सर्क्युलर **RBI**/2015-16/07/**DCBR.BPD(PCB)MC NO.**9/09.22.010 /2015-16, दि. 01/07/2015 अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

सबब, सदर प्रकरणी प्रचलित बँकींग विनियमन कायदा, 1949, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961, नागरी सहकारी बँकांचे आदर्श उपविधी आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे मास्टर सर्क्युलर **RBI**/2015-16/07/**DCBR.BPD(PCB)MC NO.**9/09.22.010/ 2015-16, दि. 01/07/2015 मधील तरतूदी विचारात विचारात घेऊन याबाबत आढावा घेऊन अहवाल सादर करणेबाबत या कार्यालयाचे स्तरावर अभ्यास समिती गठीत करण्यात आलेली होती.

सदर प्रकरणी अभ्यास समितीने उक्त नमूद कायदा,कानू मधील तरतूदींचा अभ्यास करून या कार्यालयास सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार राज्यातील नागरी सहकारी बँकांनी सहकारी गृहनिर्माण संस्थांना कर्ज पुरवठा करणेबाबत खालीलप्रमाणे विहीत अटी व शर्तीचे अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे-

**विहीत अटी व शती :-**

i. संबंधीत नागरी सहकारी बँकेने सहकारी गृहनिर्माण संस्थेस कर्जपुरवठा करणेसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेचे मास्टर सर्क्युलर **RBI**/2015-16/07/**DCBR.BPD(PCB)MC NO.**9/09.22.010 /2015-16, दि. 01/07/2015 मधील तरतुदीनुसार व सदर परिपत्रकातील सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे अटीस अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.
ii. कोणत्याही परिस्थितीमध्ये असे कर्ज विनातारणी देण्यात येवू नये.
iii. कर्ज रक्कमेपोटी नागरी सहकारी बँकेने संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मालमत्तेवर योग्य तो बोजा निर्माण करावा. याबाबत कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात यावी.
iv. असे कर्ज देताना नागरी सहकारी बँकेच्या हिताच्या दृष्टीने सर्व खबरदारी घेण्यात यावी.

v. नागरी सहकारी बँक, संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्थांना करीत असलेल्या कर्जाची परतफेड सदर सहकारी गृहनिर्माण संस्थांना अन्य संस्थेने प्रकल्प उभारणीसाठी कर्ज दिल्यास त्या रक्कमेतून प्राधान्य क्रमाने करण्यात यावी.

vi. सहकारी गृहनिर्माण संस्थांना कर्ज मंजूरीचे वेळी एका प्रोजक्टवर दोनदा (**Double Financing**) कर्ज मंजूर व वितरण होणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

vii. सहकारी गृहनिर्माण संस्था स्तरावर कर्ज वितरण व सभासद वा इच्छुक खरेदीदार यांनी घेतलेले स्वतंत्र कर्ज अशा प्रकारे एकाच मालमत्तेवर दोनदा कर्ज मंजूर होण्याची शक्यता गृहीत धरून प्रचलित अधिनियम, नियम व रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया कडून याबाबत निर्गमित परिपत्रकातील तरतूदीनुसार कर्ज मंजूरीचे वेळी विशेष काळजी घेण्यात यावी.

viii. कर्ज मंजूर करताना प्रचलित अधिनियमातील तरतूदी व वेळोवेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया कडून याबाबत निर्गमित परिपत्रकीय सूचनांचे काटेकोर पालन करावे. यासाठी कर्ज अदा करताना आवश्यक त्या अटी शर्ती घालण्यात याव्यात. अटी/शर्तींचा नियमभंग करून असे कर्ज वाटप झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत नागरी सहकारी बँकेच्या संचालकांची वैयक्तीक व सामुदायिक राहील.

**(दिपक तावरे,** भा.प्र.से.)
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**


# सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. माधवेंद्र कोरडे** - (फक्त मेसेजसाठी) **९८५०५७१४०५**
**श्री. श्रीकांत पटवर्धन** (प्रदेश कार्यालय प्रमुख) **९२२५८२५३९९**

सहकार भारती पुणे कार्यालय – ऑफिस क्र. १०५, सांकला आर्केड, गांधी खादी भांडारच्यावर, कर्वे रोड, एरंडवणा, पुणे– ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com

सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे : रिजनल हेड (विदर्भ) 9420116337**

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| पुणे | श्रीमती रजनी देव | 9860754271 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| सांगली | सौ. श्वेता कुलकर्णी | 8830837005 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर शहर | सौ. दिपाली कुलकर्णी | 9049785111 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-दहिसर | श्री. हितेश वाघेला | 8828384482 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| वसई | श्री. संतोष शिंदे | 8652415015 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |
| पनवेल | श्री. संजय पावसकर | 8928323997 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| चाळीसगाव, जळगाव | ॲड. विकास देवकर | 7588440640 |
| धुळे | श्री. बी. एम. कुलकर्णी | 9420602441 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. अभय बावस्कर | 9422202569 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार कायदा व वसुलीची प्रक्रिया | २००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |
| ४ | डिजीटल तंत्रज्ञानाचे धोके व सावध, सुरक्षित वापर | १५०/- |

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ मे २०२२ पासून-
**वार्षिक रु. ४००/- त्रैवार्षिक रु. १०००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**


safeage
Security Products Pvt. Ltd.
OM SALES CORPORATION
All our Products are BIS Standards
Our Certificates
ISO 14001 : 2004
IS 5244 : 2014
CM/L-7500087614
IS 550 : 2014
CM/L-3978088
IS 11188 : 2014
CM/L-2870669
ISO 9001 : 2008
Electronic safe
Depository safe
Gold Safe
Fire Resistant Cabinet
Fire Resistant Filing Cabinet
Industrial Locker
Compactor
Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947
Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com
Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.
Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur
We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri,
Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar,
Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded,
Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara,
Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,

पतसंस्था व बँकांसाठी...
# मार्ग परिपूर्ण तंत्रज्ञानाचा

**K3One**
कोअर बँकिंग प्लॅटफॉर्म


- सर्व बँकिंग मॉड्यूल - सदस्यत्व, CASA, ठेवी, कर्ज, गुंतवणूक
- डॅशबोर्डसह व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS)
- कर आकारणी आणि अनुपालन - TDS, GST
- TIER IV प्रमाणित डेटा सेंटर
- सायबर सुरक्षा अनुपालन मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन, ॲप्लिकेशन VPN

**SIMFI**
निओ बँकिंग प्लॅटफॉर्म

- डिजिटल कस्टमर ऑनबोर्डिंग
- कर्ज उत्पत्ति प्रणाली (Loan Origination System)
- व्हॉइस अलर्टसह मर्चंट मोबाइल ॲप
- स्कॅन आणि पे सुविधेसह कस्टमर मोबाईल ॲप
- डिजिटल पेमेंट - NEFT, RTGS, IMPS, UPI - QR
- सेल्फ सर्व्हिस किओस्क
- डोअरस्टेप बँकिंग
- पिग्मी एजंटसाठी मोबाइल ॲप

**SEVAA**
सेवा-पुर्तती प्लॅटफॉर्म

- सॉफ्टवेअरच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आणि सेवेसाठी एक प्रभावी साधन
- पतसंस्थांसाठी प्रथमच 'प्रशिक्षण, सेवा आणि सपोर्ट ट्रॅकींगसाठी ऑनलाइन डॅशबोर्ड'
- पूर्णपणे पारदर्शक आणि प्रक्रिया-चालित सिस्टीम



**PEOCIT**

**पिओसिट सॉफ्टवेअर सोल्युशन्स प्रा. लि.**
(ISO 9001 व 27001 प्रमाणित कंपनी)
**कॉर्पोरेट ऑफिस :** ऋषिकेश, न्यू इंडिया स्कूलजवळ, भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे - 411038. **फोन नं. :** +91 20 2528 3002, 6529 0201,
**ई-मेल :** sales@peocitsoft.com **www.peocit.in**

**संपर्क :** 9960100312 / 9561088987 / 9561003398 / 9960100339 / 9960100333

**शाखा :** पुणे / मुंबई / सातारा / नागपुर / सोलापुर / गोवा / इंदोर हैद्राबाद / रायचूर / बेंगळुरू / बेळगावी / अहमदाबाद / वडोदरा

लाईव्ह डेमो किंवा साईट व्हिजिट करीता +91 86050 10318 / www.k3one.com



उज्वल भविष्याच्या गुंतवणुकीची सुरुवात!
लोकमान्य
मान्सून
योजना
१०.२५*%
मुदत ठेवीवर
आकर्षक व्याजदर
*फक्त सभासदांकरिता *नियम व अटी लागू
किमान रक्कम : ₹ १०,००० व अधिक | त्रैमासिक व्याज परतावा
कालावधी ५०० दिवस
ज्येष्ठ नागरिकांसाठी ०.५०%
अधिक व्याजदर
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : श्री. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org



50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.
MULTI-STATE SCHEDULED BANK
INTRODUCING
SAKHI SAVINGS ACCOUNT
Start your account with Zero Balance
Free RuPay Debit card with a built-in accidental cover of ₹ 1 lakh*
Girls above 18 years & Women can open this account
Special concession while availing loan*
* T & C APPLY
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.in
KJSBank

Janaseva Sahakari Bank Ltd. Hadapsar, Pune

# उच्च शिक्षणाचे तुमचे स्वप्न, साकार करेल जनसेवेचे कर्ज !




## ज्ञानगंगा शैक्षणिक कर्ज

- भारतातील व परदेशातील सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणासाठी रु. ५० लाखांपर्यंत कर्ज
- मार्जिन : १० ते १५%
- मुदत : Max.१४४ महिने (Including Moratorium Period)
- प्रोसेसिंग फी : रु. १००० + GST

**व्याजदर 8.90%***

* अटी लागू

उच्च शिक्षण देशात असो अथवा परदेशात जनसेवा बँकेचे सहज सुलभ असलेले शैक्षणिक कर्ज म्हणजे आपल्या आकांक्षांचा भक्कम आधार.


आजच नजीकच्या शाखेत संपर्क करा व आपल्या पाल्याचे भवितव्य उज्ज्वल करा !

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर,पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय** : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.
व्हाॅट्सअप नंबर : 89565 47595, email : marketing@janasevabankpune.in
www.janasevabankpune.net


टीजेएस्‌बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
तुमच्या व्यावसायिक प्रगतीसाठी
कायम तुमच्या बरोबर!
टीजेएस्‌बी
प्रोफेशनल लोन
120* महिने परतफेड कालावधी
आकर्षक व्याजदर
नो कोलॅटरल्स
कर्ज ₹1कोटी पर्यंत
कार्यरत असलेले व नवोदित प्रोफेशनल्स् ह्या दोघांसाठी योजना लागू
*अटी लागू
www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 223 466 / 1800 266 3466


सारस्वत
बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
विश्वासाच्या नात्याची अविरत परंपरा...
FIXED DEPOSITS
आकर्षक व्याजदर !
7.75 % p.a.
ज्येष्ठ नागरिकांसाठी
7.25 % p.a.
इतरांसाठी
अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेशी किंवा www.saraswatbank.com या वेबसाईटवर संपर्क करा.
नियम व अटी लागू. जून 2024
Follow us:

**Registered**
**SAHAKAR SUGANDHA - RNI NO. MAHMUL/2005/16099 (DECL NO. SDM/HAVELI/PUNE/SR/20/2017)**
**Postal Reg. No. : PCW/161/2023-2025 Licence to Post without Pre-payment of Postage no. WPP-29**
**(Publication Date - 05/07/2024) Posting on 07/07/2024 at PSO, Pune GPO - 411 001**




**प्रेषक :**
**सहकार सुगंध कार्यालय**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

प्रति,